शुक्रवार, २६ नोव्हेंबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक १२९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## सलग दुसऱ्या वर्षी हिवाळी अधिवेशन मुंबईत



**मुंबई :** हिवाळी अधिवेशन नागपूरला होणार की मुंबईला यावरून अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. अखेर अधिवेशनाची तारीख ठरली असून डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात मुंबईमध्ये हिवाळी अधिवेशन होणार आहे. त्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी हिवाळी अधिवेशन मुंबईत होणार आहे. याबाबत कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. अधिवेशन नागपूरला घ्यावे की मुंबईला यावरून महाविकास आघाडी सरकारमध्येच मतभेद होते, मात्र आता हे अधिवेशन मुंबईतच होणार आहे. हा निर्णय घेण्यामागे कोरोनाचे सावट आणि विधान परिषद निवडणूक ही कारणे असल्याचेही बोलले जात आहे.

## अंतरंग

बदलत्या वातावरणाचा मच्छीमारांना फटका/३
ओबीसी जागर रथयात्रेचे खोपोली, कर्जतमध्ये स्वागत/५
कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी भारत ४ बाद २५८/६

# एसटी कर्मचारी विलिनीकरणावर अजूनही ठाम

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांसाठी पगारवाढीची घोषणा करूनही कर्मचारी मात्र विलिनीकरणाच्या मुद्द्यावर ठाम आहेत. त्यामुळे आतापर्यंत मुंबईतील आझाद मैदानात एसटी कर्मचाऱ्यांना पाठिंबा देणारे गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी आंदोलनाबाबतचा यापुढील निर्णय एसटी कर्मचारीच घेतील, असे सांगून त्यांना गुरुवारी (दि. २५) शुभेच्छा दिल्या आहेत.



राज्यभरातील इतर ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनाबाबत कामगार जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल, असे सदाभाऊ खोत यांनी जाहीर केले. बुधवारी राज्य सरकारने एसटी कर्मचाऱ्यांसाठी वेतनवाढ आणि वेतन हमीसंदर्भात महत्त्वाच्या घोषणा केल्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांच्या भूमिकेकडे सगळ्यांचे लक्ष लागले होते. आज त्यासंदर्भात सदाभाऊ खोत यांनी निर्णय जाहीर केला.

विलिनीकरणाचा लढा सुरूच राहणार आहे, पण सरकार दोन पावले पुढे आले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. पहिला टप्पा आम्ही जिंकलो आहोत. न्यायालयाच्या निर्णयानंतर जर आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरू झाला, तर त्यात कामगारांसोबत आम्ही उभे राहू. राज्यभरातील इतर ठिकाणी सुरू असलेल्या आंदोलनाबाबतचा पुढील निर्णय कर्मचाऱ्यांनी घ्यायचा आहे. त्यात आम्ही कर्मचाऱ्यांसोबत असू, असेदेखील सदाभाऊ खोत म्हणाले.

कर्मचाऱ्यांनी हे आंदोलन उभे केले होते. आम्ही आझाद मैदानात त्यांना घेऊन आलो होतो. आम्ही तात्पुरते आझाद मैदानातले आंदोलन मागे घेतले आहे, असे सदाभाऊ खोत यांनी सांगितले. कामगारांनी हे आंदोलन उभे केले होते. त्यामुळे त्यांनी याबाबतचा पुढचा निर्णय घ्यायचा आहे. कामगारांना न्याय मिळावा हा आमचा हेतू होता. आंदोलकांनी पुढे आंदोलन सुरू ठेवले, तर त्याला आमचा पाठिंबा असेल, असे या वेळी सदाभाऊ खोत यांनी स्पष्ट केले.

हा राज्याच्या इतिहासातला कामगारांनी स्वत: उभ्या केलेल्या संपातला एक मोठा विजय आहे. खऱ्या अर्थाने हा निर्णय कामगारांचे मोठे यश आहे. पहिल्या टप्प्यातला हा विजय आहे. भविष्यात विलिनीकरणाची लढाई सुरूच ठेवायची आहे. कामगारांच्या संपाला राज्यातल्या जनतेची मोठ्या प्रमाणात सहानुभूती लाभली होती. शासकीय कर्मचारी आणि एसटी कामगार यांच्यातली तफावत सरकारला दूर करावी लागेल. आम्ही दोघे आमदार एसटी कामगारांचे प्रतिनिधी म्हणून सभागृहात त्यांची बाजू मांडत राहणार आहोत, असे सदाभाऊ खोत यांनी या वेळी सांगितले.

संपाचे नेतृत्व गोपीचंद पडळकर, सदाभाऊ खोत करताहेत. आम्ही भाजपचे आमदार म्हणून संपात सहभागी झालेलो नाही. एसटी कर्मचाऱ्यांच्या मुद्द्यावर आंदोलनाला आम्ही आझाद मैदानावर सुरुवात केली. कर्मचाऱ्यांना तिथे यायचे आवाहन केले. आमच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन कर्मचारी तिथे दाखल झाले, पण विलिनीकरणाचा निर्णय येईपर्यंत संप तसाच सुरू ठेवणे शक्य नाही, असे गोपीचंद पडळकर यांनी या वेळी बोलताना सांगितले.

# प्राथमिक शाळा होणार १ डिसेंबरपासून सुरू

## ▪ राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई : प्रतिनिधी**

पहिली ते चौथीच्या शाळा १ डिसेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. या आधीच पाचवीपासूनचे पुढचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत. आता पहिली ते चौथी हे वर्ग देखील सुरू करण्यात आले असल्यामुळे आता राज्यातल्या सर्व शाळा सुरू होणार आहेत. यासंदर्भात लवकरच आवश्यक ती कोरोना नियमावली जाहीर करण्यात येईल, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पहिली ते चौथी या वर्गातील मुले लहान असल्यामुळे त्यांच्या सुरक्षेची काळजी प्रामुख्याने शाळांवर असणार आहे. शाळेतले शिक्षक, मुख्याध्यापक आणि शालेय प्रशासनाला यासंदर्भातले योग्य ते आदेश देण्यात येणार आहेत.

ग्रामीण भागात पाचवी ते बारावी तर शहरी भागात आठवी ते बारावीची शाळा-महाविद्यालये सुरू झाली होती. त्यानंतर ग्रामीण भागात पहिली ते चौथी आणि शहरी भागात पहिली ते सातवी शाळा सुरू करण्याबाबत चर्चा सुरू केली होती. त्याची फाईल मुख्यमंत्र्यांना मंजुरीसाठी पाठवली होती. आज मंत्रिमंडळ बैठकीत यावर शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांनी दिली आहे.



राज्य सरकारच्या या निर्णयामुळे आता राज्याच्या ग्रामीण आणि शहरी भागात पहिलीपासून बारावीपर्यंत सर्व वर्गांच्या शाळा सुरू झाल्या आहेत. आगामी काळात या वर्गांसाठी लागू करावयाच्या नियमावलीबाबत टास्क फोर्ससोबत चर्चा केली जाईल. विद्यार्थ्यांच्या पालकांशी, शिक्षकांशी चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे. सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण वातावरण कसे दिले जाईल, याची काळजी घेतली जाईल, असेदेखील वर्षा गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत या निर्णयाची माहिती देताना नमूद केले.


मुलांचे कुठेही शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची काळजी घेतली जाईल. मुलांना एकत्र बसून शिक्षण घेण्याची आवश्यकता तज्ज्ञांकडून व्यक्त केली गेली आहे. त्यानुसार चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे, असेदेखील वर्षा गायकवाड म्हणाल्या.

# केंद्रीय मंत्री कपिल पाटील आज मोहोपाड्यात

## पाणी परिषदेला करणार मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत 'हर घर नल हर घर जल' या मोहिमेंतर्गत शुक्रवारी (दि. २६) सायंकाळी ५ वाजता मोहोपाडा मैदानावर केंद्रीय पंचायतराज मंत्री कपिल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.



या सोहळ्यास प्रमुख मान्यवर माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार देवेंद्र साटम, भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, खालापूर तालुकाध्यक्ष रामदास ठोंबरे, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे उपस्थित राहणार आहेत.

वासांबे, पुनाडे आठगाव पूर्व विभाग आणि चाणजे या परिसरातील गावांकरिता पाण्याची दीर्घकालीन योजना राबविण्याच्या दृष्टिकोनातून या पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी केले आहे.

# 'मी आता थेट न्यायालयातच बोलेन'

**मुंबई : प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार मी इथे आलोय. सध्या मला कशासंदर्भातही बोलायचे नाही. मी थेट न्यायालयामध्येच माझी भूमिका मांडणार आहे, असे परमबीर सिंह यांनी गुरुवारी (दि. २५) म्हटले आहे.

फरार घोषित करण्यात आलेले मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह गुरुवारी मुंबईत दाखल झाले. तपास यंत्रणांना सहकार्य करण्यासाठी ते आज थेट कांदिवलीमधील गुन्हे शाखेच्या युनिट ११ मध्ये हजर झाले.

# जेएनपीटी बंदर आणि सीमाशुल्क विभागाच्या सुविधांबाबत निर्मला सीतारामन यांनी घेतला आढावा




**उरण : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवारी (दि. २५) जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी)ला भेट दिली. त्यांनी बंदराच्या कामकाजाविषयी आणि सीमाशुल्क सुविधांच्या श्रेणीबद्दल सर्वसमावेशक माहितीचा आढावा घेतला. या वेळी जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी, उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ उपस्थित होते.

जेएनपीटीच्या अत्याधुनिक सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझाला त्यांनी भेट दिली आणि सीपीपीमध्ये फॅक्टरी सीलबंद निर्यात कंटेनरसाठी सीमाशुल्क तपासणी सुविधा उभारण्याच्या कामाचे उद्घाटन केले. याशिवाय त्यांनी जेएनपीटी गॅझेबो व्ह्यू-पॉइंटवरून सर्व टर्मिनल्स आणि आसपासच्या पायाभूत सुविधांचा आढावा घेतला, तसेच समुद्राच्या बाजूने सर्व बंदर टर्मिनल्सचे लेआउट आणि पायाभूत सुविधांचे मूल्यमापन केले. या वेळी त्यांना व्यापार आणि वाणिज्य गतिमान करण्याच्या उद्देशाने जेएनपीटीच्या अनेक उपक्रमांची माहिती देण्यात आली.

# विवेक पाटील यांना आणखी पाच दिवस कोठडी

## आता सुनावणी ३० नोव्हेंबरला



**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेल्या कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर निकाल देण्यापूर्वी सरकारी वकिलांचे म्हणणे न्यायालय ऐकून घेणार आहे. त्यामुळे या प्रकरणाची सुनावणी आता ३० नोव्हेंबर रोजी होणार असून तोपर्यंत विवेक पाटील यांना आणखी पाच दिवस कोठडीतच काढावे लागणार आहेत.

न्यायालयासमोर या प्रकरणी आपले म्हणणे मांडण्यासाठी 'ईडी'च्या वकिलाने वेळ मागितली आहे. त्यामुळे न्यायालयाने आता पुढील सुनावणी ३० नोव्हेंबर रोजी होईल, असे सांगितले. त्या वेळी सरकारी वकील आपले म्हणणे मांडून जामिनाला विरोध करतील, असे समजते. विवेक पाटील यांच्या वकिलांनी जामिनाबाबत त्यांची बाजू आतापर्यंतच्या वेळोवेळी झालेल्या सुनावणीत मांडली आहे.

# शक्ती मिल प्रकरणातील आरोपींची फाशी रद्द

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईसह संपूर्ण देशाला हादरवून सोडणाऱ्या शक्ती मिल सामूहिक बलात्कारप्रकरणी गुरुवारी (दि. २५) मुंबई हायकोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. हायकोर्टाने तीन आरोपींची फाशीची शिक्षा रद्द केली असून शिक्षेचे रूपांतर जन्मठेपेत केले आहे. २०१३ मधील या प्रकरणातील आरोपींनी फाशीच्या शिक्षेला आव्हान दिले होते. घटना घडली तेव्हा लोकांचा रोष अधिक होता, पण कायद्याचा विचार करता हे प्रकरण फाशीचे नाही, असे कोर्टाने या वेळी नमूद केले.

आरोपींनी मुंबई सत्र न्यायालयाने ४ डिसेंबर २०१४ ला सुनावलेल्या फाशीच्या शिक्षेला आव्हान दिले होते. हायकोर्टाने ही याचिका फेटाळून लावली होती. आरोपींची शिक्षा निश्चित करण्यासंबंधीचा निर्णय हायकोर्टाने राखून ठेवला होता. या प्रकरणी विजय जाधव, कासीम बंगाली, सलिम अन्सारी, सिराज खान आणि एका अल्पवयीन मुलाला अटक केली होती. कोर्टाने सिराज खान याला जन्मठेपेची आणि इतर तिघांना फाशीची शिक्षा सुनावली होती. अल्पवयीन मुलाची बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली आहे.

# नवाब मलिकांना वानखेडे कुटुंबावर बोलण्यास न्यायालयाची बंदी



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांना मुंबई हायकोर्टाने झटका दिला आहे. एनसीबीचे विभागीय संचालक समीर वानखेडे यांच्या कुटुंबीयांबाबत वक्तव्य किंवा आरोप करण्यास बंदी घातली आहे. त्यानंतर वानखेडे कुटुंबाबद्दल सोशल मीडियावर काहीही पोस्ट करणार नाही, अशी हमी नवाब मलिक यांनी वकिलांच्या माध्यमातून मुंबई हायकोर्टाला दिली.

# जिल्ह्यात १८२ ग्रामपंचायतींमधील २८५ रिक्त पदांसाठी पोटनिवडणूक जाहीर


**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या रायगड जिल्ह्यातील एकूण १८२ ग्रामपंचायतींमधील २८५ रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली आहे.

नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची अतिरिक्त ठरलेली रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्याचा सोमवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ असून तहसीलदार यांनी निवडणुकीची नोटीस सोमवारी दिनांक २२ नोव्हेंबर २०२१ रोजी प्रसिध्द केली आहे.

मतदानाचा दिनांक मंगळवार २१ डिसेंबर रोजी राहील, तर मतमोजणी बुधवारी २२ डिसेंबर रोजी होईल. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणुकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा अंतिम दिनांक सोमवार २७ डिसेंबरपर्यंत राहील.

या पोटनिवडणुकांसाठी राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. जात पडताळणी समितीस प्रस्ताव सादर केल्याची पावती ग्राह्य धरण्यात येणार नाही, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर व उपजिल्हाधिकारी सर्जेराव म्हस्के-पाटील यांनी केले आहे.






# ठाकरे सरकार घरात लपून बसले तेव्हा महाराष्ट्राला कोरोनामधून केंद्राने सावरले

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने वेळोवेळी केलेल्या मदतीमुळेच महाराष्ट्र कोरोनाच्या विळख्यातून सावरू शकला, अन्यथा घरकोंबड्या ठाकरे सरकारच्या सल्ल्यानुसार कोमट पाणी पिऊन कोरोनाविरोधातील केविलवाणी झुंज सुरूच राहिली असती, अशी टीका भाजपच्या राष्ट्रीय प्रवक्त्या खासदार डॉ. हीना गावित यांनी गुरुवारी (दि. २५) पत्रकार परिषदेत केली. प्रदेश भाजप कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत डॉ. गावित बोलत होत्या.

प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये या वेळी उपस्थित होते. जनादेश धुडकावून फसवणुकीने सत्तेवर आलेल्या ठाकरे सरकारने कोरोनाकाळात भ्रष्टाचार, धोरणलकवा आणि ढिसाळपणामुळे महाराष्ट्राला कडेलोटाच्या खाईत लोटल्याने कोरोनाविरोधी लढ्यातील सर्वांत अपयशी राज्य म्हणून महाराष्ट्राची नोंद झाली आहे, अशी घणाघाती टीकाही डॉ. गावित यांनी या वेळी केली.




**भाजप नेत्या डॉ. हीना गावित यांची टीका**

कोरोनाकाळात मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्याची जोरदार स्पर्धाच सुरू होती. भ्रष्ट कारभारामुळेच महाराष्ट्रात सर्वाधिक कोरोना मृत्यू, सर्वाधिक रुग्णसंख्या, सर्वाधिक संसर्गदर आणि सर्वाधिक लुबाडणूक झाली व हजारो लोकांना नाहक प्राण गमवावे लागले. केंद्र सरकारकडून वेळोवेळी कानपिचक्या मिळूनही भ्रष्टाचार सुरूच राहिल्याने महाराष्ट्राची आर्थिक स्थिती खालावली व सत्ताधाऱ्यांच्या गोतावळ्याने मात्र संधीची चांदी करून घेतली. प्रत्येक अपयशावर पांघरुण घालत केंद्र सरकारकडे बोटे दाखविणाऱ्या ठाकरे सरकारला या काळात गरीबांसाठी मिळालेली मदतही लाभार्थीपर्यंत पोहोचविण्यात अपयश आल्यामुळे असंख्य कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली, असा आरोप डॉ. गावित यांनी केला.

कोविडकाळात मंत्रालयातून पळ काढून घरात कोंडून घेणाऱ्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रास वाऱ्यावर सोडून संकटाशी सामना करण्याची जबाबदारीही नागरिकांवरच ढकलली. या अपयशास 'मी जबाबदार' असे नागरिकांकडून वदवून घेताना, स्वतःच्या कुटुंबाची सुरक्षितता सांभाळत 'माझे कुटुंब एवढीच माझी जबाबदारी', असा बेजबाबदार बाणाही दाखविला, असा टोलाही डॉ. गावित यांनी लगावला.

मृतदेह गुंडाळण्याच्या प्लास्टिक पिशव्यांमध्ये भ्रष्टाचार, पीपीई किटमध्ये भ्रष्टाचार, व्हेंटिलेटर्स आणि रेमडेसीवीरसारख्या औषधांचा काळाबाजार, ऑक्सिजनचा तुटवडा, लस वाटपातील वशिलेबाजी व साठेबाजी, दर्जेदार आरोग्य सुविधांचा अभाव, कोविड सेंटरमधील भ्रष्टाचार शिगेला पोहचला होता, तेव्हा मुख्यमंत्री मात्र घरात लपून बसले होते. केंद्र सरकारने महाराष्ट्राला गव्हासाठी पावणेदोन हजार कोटी, तांदळासाठी दोन हजार ६२० कोटी, डाळींसाठी १०० कोटी, स्थलांतरित मजुरांच्या मदतीसाठी १२२ कोटी अशी एकूण ४५९२ कोटींची मदत केवळ अन्नधान्यासाठी केली. गरिबांना मोफत धान्य देण्याची योजना आखली, तसेच राज्यातील ८६ हजारांहून अधिक शेतकरी, विधवा, दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना थेट मदतीच्या रूपाने तीन हजार ८०० कोटींची रक्कम बँक खात्यांत जमा केली. ठाकरे सरकारने जाहीर केलेल्या मदतीचा एक पैसादेखील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला नाही. हा पैसा कुणाच्या खिशात गेला, याची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी डॉ. गावित यांनी केली.

कोरोनाकाळात जेव्हा महाराष्ट्रातील जनता आर्थिक संकटामुळे हतबल झाली होती, तेव्हा ठाकरे सरकारचे मंत्री मात्र भ्रष्टाचार आणि खंडणी वसुलीतून कोट्यवधींचा मलिदा उकळत होते. सरकारच्या भ्रष्ट कारभारामुळेच जनतेकडे दुर्लक्ष होऊन हजारो मृत्यू ओढवल्याने या अपयशाची जबाबदारी घेऊन दोन वर्षांच्या कारभाराची काळी पत्रिका जारी करावी, अशी मागणी त्यांनी केली.



## पनवेलमध्ये मोफत ई-श्रम कार्ड वाटप

### भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवस तालुक्यात विविध कार्यक्रम राबवून मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्याअंतर्गत भाजप युवा मोर्चा पनवेलच्या वतीने वाढदिवसाचे औचित्यसाधून मोफत ई-श्रम कार्ड वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि. २५) करण्यात आले होते. या कार्यक्रमात अरुणशेठ भगत यांच्या हस्ते ई-श्रम कार्डचे वाटप करण्यात आले.

ई-श्रम कार्ड ही आणखी एक महत्त्वकांशी योजना केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या कामगार व रोजगार मंत्रालयामार्फत राबवली जात आहे. त्यानुसार भाजप युवा मोर्चा पनवेल यांच्यावतीने पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ई-श्रम कार्ड वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानुसार भाजपच्या पनवेल येथील मध्यावर्ती कार्यालयात गुरुवारी अरुणशेठ भगत यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या कार्डांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, जिल्हा सचिव चिन्मय समेळ, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, भाजप नेते चंद्रकांत मंजुळे, ई-श्रम कार्डचे पनवेल संयोजक कादिर शेख, आत्मनिर्भर भारतचे संयोजक आकाश भाटी, कोषाध्यक्ष देवांशू प्रभाळे तसेच उमेश पोदार, रोहित कोळी, सिद्धार्थ मोहिते आदी उपस्थित होते.

कोरोना महामारीच्या काळात भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच युवा मोर्चाने जीवाची पर्वा न करता गोरगरीब जनतेची सेवा करत प्रेरणा देण्याचे काम केले आहे. युवा मोर्चाने वाढदिवसानिमित्त हा सेवाभावी उपक्रम राबवल्याबद्दल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी आभार मानले.

## दास्तानफाटा ते गव्हाणदरम्यान पाणी चोरीची घटना उघडकीस

### ग्रामस्थांनी केली सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण आणि न्हावा ग्रामपंचायत हद्दीतील नागरिक तीव्र पाणीटंचाईने त्रस्त झालेत. दास्तानफाटा ते गव्हाण या पाण्याच्या पाइपलाइनमधून अनधिकृतपणे पाण्याचे कनेक्शन घेतल्याने या गावांना गेल्या २० दिवसांपासून पाणीपुरवठा होत नव्हता. या विरोधात गुरुवारी (दि. २५) नागरिकांनी दास्तान फाटा येथे सिडकोच्या अधिकाऱ्यांसोबत पाहणी करत पाणी चोरीची घटना उघडकीस आणली. या वेळी ग्रामस्थांचा आक्रोश पाहता लवकरात लवकर या समस्येवर मार्ग काढून पाणी चोरी करणाऱ्यांवर कारवाई करून पाणी पुरवठा सुरळीत करणार असल्याचे आश्वासन सिडको अधिकाऱ्यानी दिले.



बेलपाडा, गव्हाण, कोपर, शेलघर, शिवाजीनगर, न्हावाखाडी, न्हावा या परिसरात नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. गेली अनेक दिवस येथील नागरीक गव्हाण आणि न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांनी या संदर्भात सिडको तसेच ओएनजीसी अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला, परंतु कोणताही तोडगा न निघल्याने गुरुवारी सिडकोचे पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता व्ही. जी. पांडुळे यांच्यासोबत पाहणी केली. या वेळी दास्तानफाटा ते गव्हाण या पाण्याच्या पाइपलाइनमधून कंटेनर यार्ड, वेअर हाऊस, सर्व्हिस सेंटर हे पाणी चोरी करत असल्याचे समोर आले.

**...अन्यथा आंदोलन करू**
–वामन म्हात्रे

*गेल्या काही दिवसांपासून अधिकाऱ्यांना सातत्याने तक्रार करुनही या समस्येवर तोडगा निघत नाही आहे. त्यामुळे सिडकोने या पाण्याच्या समस्येवर लवकरात लवकर मार्ग काढला नाही तर आंदोलन करणार असल्याचा इशारा भाजप नेते वामन म्हात्रे यांनी दिला.*

या वेळी ग्रामस्थांचा आक्रोश पाहता लवकरात लवकर या समस्येवर मार्ग काढून पाणीपुरवठा सुरळीत करणार असल्याचे आश्वासन देत अनधिकृतपणे कनेक्शन तोडणाऱ्यांना समज दिली जाईल व पुढे अशी घटना घडली तर गुन्हा दाखल करणार असल्याचे सिडको अधिकाऱ्यांनी सांगितले.

या वेळी न्हावाचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, सदस्य सचिन घरत, हेमंत पाटील, अरुण कोळी, कामिनी कोळी, उषा देशमुख, सुनिता घरत, रोशन म्हात्रे, भाजप नेते ज्येष्ठ नेते वामन म्हात्रे, न्हावा ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, प्रल्हाद पाटील, अमृता पाटील, कल्पना घरत, निर्मला ठाकूर, साधना तांडेल, शांता म्हात्रे, विजय ठाकूर, मिनाक्षी पाटील यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## पेण, महाड आगारातून एसटीच्या फेऱ्यांना सुरुवात

**पेण, अलिबाग : प्रतिनिधी**

विलीनीकरणाच्या मागणीबाबत काही एसटी कर्मचारी ठाम आहेत तर काही ठिकाणी मात्र कर्मचारी कामावर हजर होण्यास सुरुवात झाली आहे. महाड, पेणमध्येही अनेक चालक, वाहक कामावर रुजू झाले असुन गुरुवारी (दि. २५) पेण-खोपोली, नागोठणे व पनवेल तर महाडमधून माणगाव, फाळकेवाडी मार्गावर गाड्या धावल्या.

दिवाळीनंतर एसटी संपाला सुरुवात झाली होती. एसटी सेवा बंदचा फटका विद्यार्थी व नोकरदार वर्गाला बसत होता. हळूहळू महाड, पेण बसस्थानकातून पहिली एसटी बस सुटल्याने प्रवाशांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. आतापर्यंत ९० कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात आले असुन सर्व कर्मचाऱ्यांना कामावर रुजू होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आज २४६ कर्मचारी कामावर आले आहेत. त्यांच्या माध्यमातून महाड व पेण आगारातून बससेवा सुरू झाली. प्रवाशांनी या एसटी सेवेचा लाभ घ्यावा. हळूहळू एसटी सेवा पूर्ववत होईल अशी आशा आहे, असे रायगडच्या एस. टी. विभाग नियंत्रक अनघा बारटक्के यांनी सांगितले.





**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शुक्रवार, दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- १२. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १३. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १४. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल
- १५. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली
- १६. सेंट्रल रेल्वे, पनवेल

**कोवॅक्सिन**

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल
- ३. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

**पनवेल ग्रामीण लसीकरण**

- टेंभोडे, रा.जि.प. शाळा
- भोईरपाडा, रा.जि.प. शाळा
- देवीचापाडा, रा.जि.प. शाळा
- फणसवाडी
- खांदा गाव, प.म.पा शाळा
- तोंडरे वरचा पाडा, रा.जि.प. शाळा
- पेठाली, रा.जि.प. शाळा
- भिंगारी, रा.जि.प. शाळा
- कांदेवाडी
- नागझरी, रा.जि.प. शाळा




## खालापूर भाजपची आढावा बैठक

**खालापूर : प्रतिनिधी**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आदेशानुसार, जिल्हा सरचिटणीस विनोद साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत खालापूर मंडल अध्यक्ष रामदास ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. २५) खालापूर नगरपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपची आढावा बैठक झाली.

या बैठकीमध्ये भारतीय जनता पक्ष खालापूर शहरात सर्व १७ प्रभागात उमेदवार उभे करून निवडणूक लढवणार असल्याचे जाहीर करण्यात आले.

या बैठकीला शहर अध्यक्ष राकेश गव्हाणकर, युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद पाटील, जिल्हा सरचिटणीस आदिवासी मोर्चा अनंता वाघमारे, लक्ष्मण जाधव, मनोज मिसाळ, छगन मिसाळ, गणेश पारंगे, योगेश जाधव, प्रमोद गव्हाणकर व कार्यकर्ते उपस्थित होते.

## काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीमध्ये जाहीर प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका काँग्रेसमधील अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुनील तटकरे यांच्यासह अन्य राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. यावरून राज्यातील महाविकास आघाडीच्या घटकपक्षांमध्ये स्थानिक पातळीवर समन्वय नसल्याचे चित्र दिसून आले.

या वेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुदाम पाटील, जिल्हा महिला उपाध्यक्ष शशिकला सिंह, जिल्हा कार्याध्यक्ष ताहीर पटेल, मजदूर सेल जिल्हाध्यक्ष अमित लोखंडे, सेवादल महिला जिल्हाध्यक्ष सुदेशना रायते, ट्रान्सपोर्ट सेल जिल्हा अध्यक्ष विनीत कांडपिळे, कळंबोली महिला ब्लॉक अध्यक्षा जयश्री खटकले, नरेश कुमारी मेहमी, वीर सिंग यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला.

सुदाम पाटील यांचा राष्ट्रवादीत योग्य सन्मान करण्यात येईल व त्यांच्या बरोबरीने प्रवेश केलेल्या सर्वांनाच मानाचे स्थान मिळेल, असे जयंत पाटील यांनी या वेळी सांगितले. या वेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## तृतीयपंथी आणि देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी मतदार नोंदणी शिबिर

**पनवेल : प्रतिनिधी**

भारतीय निवडणूक आयोगाच्या आदेशाने राज्यात विशेष मतदार नोंदणी अभियान १ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने पनवेल येथील आश्रय सोशल फाउंडेशन व लोकपरिषद आयोजित तृतीयपंथी आणि देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी मतदार नोंदणी शिबिर गुरुवारी (दि. २५) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित करण्यात आले होते.

या वेळी रायगड जिल्हा उप निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांनी मनोगतामध्ये मतदार नोंदणीतून मतदानाचा हक्क तर मिळतोच पण त्यातून आर्थिक, न्यायिक आणि राजकीय गरजा पूर्ण करू शकत असल्याचे सांगितले.

या शिबिरात उप जिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, पनवेल तहसीलदार विजय तळेकर, सारिका आव्हाड, लोकपरिषदचे अशोक गायकवाड, उर्मिला यादव, शिल्पा हलणकर, रुकैया बारगीर, दीक्षिता गावंड, स्वाती कांबळे, अश्विनी लोंढे, आश्रयच्या मनीषा पवार, जयश्री जाधव, संजीवनी सावंत, मीनल मोहिते, प्रज्ञा कांबळे, सुषमा पवार व नीता जाधव उपस्थित होत्या.




शिबिरात काही ट्रान्सजेंडरनी आम्हाला काही कारणास्तव गुरू बदलावे लागतात. त्यावेळी गुरू निवासी पत्त्याबाबत घोषणापत्र देणार नाही, अशी अडचण सांगितली. तर काहींना आपले पुरुषी नाव बदलून साटल्यावरचे (साडीवरचे) नाव घेण्यात येणाऱ्या शासकीय फी बाबत शंका व्यक्त केली.

दरम्यान, ट्रान्सजेंडरकडे रहिवाशी पुराव्यासाठी भाडे करार पत्र नसते, कारण त्यासाठी द्यावी लागणारी डिपॉजिटची रक्कम त्याचेकडे नसते. तो ज्यावेळी आपल्या आई-वडिलांना सोडून वस्तीवर रहायला येतो. त्यावेळी गुरू केला जातो. साटल्यावर राहताना या गुरूला त्यांना दरमहा ठराविक रक्कम द्यावी लागते. ठरलेली रक्कम न दिल्यास त्यांना गस्हाकलून लावतो मग दुसऱ्या गुरूकडे गेल्यास यांचे बँक किवा इतर शासकीय कागदपत्रे पहिला गुरू देत नाही. कोरोना काळात गुरूला पैसे न दिल्याने अशा प्रकारच्या घटना घडलेल्या आहेत, म्हणून याबाबत काही तरी करण्याची मागणी करण्यात आली.

# बदलत्या वातावरणाचा मच्छीमारांना फटका

## ▪ मासळीची आवक घटल्याने नौका किनाऱ्यालाच

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सर्वाधिक मच्छीमारांची संख्या असलेल्या उरण तालुक्यातील मच्छीमारांवर सध्या आर्थिक संकट ओढवले आहे. कोरोना, लॉकडाऊन, चक्रीवादळे, खराब हवामान, अतिवृष्टी यांमुळे आधीच कोलमडलेला मच्छीमारी व्यवसाय आता कुठे उभारी घेत होता. त्यात आता पुन्हा बदलत्या वातावरणामुळे समुद्रात मासळीची आवक घटली आहे. त्यामुळे मच्छीमारांवर पुन्हा एकदा आर्थिक संकट कोसळले आहे.

१ ऑगस्टला मच्छीमारी हंगाम सुरू झाल्यापासून सतत खराब हवामान आणि वारंवार येणारी चक्रीवादळे यामुळे समुद्रात मासे अतिशय कमी प्रमाणात मिळत आहे. या मिळणाऱ्या मासळीच्या विक्रीतून मच्छीमारीसाठी जाणाऱ्या बोटींचा डिझेल आणि इतर खर्चदेखील निघत नसल्याने शेकडो मच्छीमारी बोटी किनाऱ्यावर लागल्या आहेत. त्यामुळे मच्छीमारांचा हंगाम वाया गेला आहे. त्यामुळे येथिल मच्छीमार मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. परिणामी बाजारातदेखील मासळीचे भाव गगनाला भिडले आहेत. मागील तीन-चार दिवसांपासून मच्छीविक्रेत्यांच्या टोपल्या रिकाम्या दिसत आहेत. ससून डॉक, कुलाबा,भाऊचा धक्का या ठिकाणी मासळी बाजारात मासळीचा तुटवडा जाणवू लागला आहे.

उरण तालुक्याला मोठा सागरी किनारा लाभला आहे. त्या अनुषंगाने उरण तालुक्यात करंजा, मोरा, दिघोडे, खोपटे, आवरे, गोवठणे, हनुमान कोळीवाडा, घारापुरी समुद्रकिनाऱ्यांच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात मच्छीमारीचा व्यवसाय केला जातो. एकट्या करंजा गावात सुमारे ११०० यांत्रिक नौका असून हजारो कुटूंबाचा उदर निर्वाह या व्यवसायावर चालतो, मात्र यावर्षी मासेमारीचा हंगाम सुरू झाल्यापासून कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे मच्छीमारीमध्ये अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे मच्छीमारांना खोल समुद्रातून मच्छिमारी न करताच परतावे लागले आहे.

याचा परिणाम त्यांच्या उत्पन्नावर झाला आहे. ट्रॉलर किंवा पर्सोनेट नौकेला मच्छिमारीला जातांना साधारणपणे दोन लाख रुपये खर्च येतो. डिझेल, बर्फ, खलाशांची मजूरी आणि त्यांचा जेवण-खाण्याचा खर्च अशा प्रकारचा साधारण खर्च असतो, मात्र मच्छीमारीचा हंगाम सूरू झाल्यापासून मच्छिमारांच्या नौका वादळ आणि खराब हवामान यामुळे अनेक वेळा परत आल्या आहेत. त्यामुळे त्यांचा झालेला खर्चदेखील निघाला नाही. त्यामुळे सध्या प्रत्येक नौका मालकांवर १० ते १२ लाखाचे कर्ज झाले आहे.



**उरण तालुक्यात मच्छीमारांसाठी लॅण्डींग पॉईंट चांगला असल्यामुळे आणि मुंबईसारखी बाजारपेठजवळ असल्यामुळे व्यवसाय चांगला फोफावला आहे, मात्र गेल्या वर्षीपासून सतत येणारी वादळे आणि खराब हवामान यामुळे मत्स्य उत्पादनात घट झाली आहे. मासेमारीसाठी येणारा खर्च आणि मिळणारे उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नाही. नफा सोडून द्या पण खर्च पण निघत नसल्यामुळे मच्छीमारांनी आपल्या बोटी किनाऱ्याला लावल्या आहेत. मच्छीमार सध्या अडचणीत आला आहे. राज्य शासनाने त्याला आर्थिक अडचणीत बाहेर करण्यासाठी आर्थिक मदत करावी.**
**-भालचंद्र कोळी, चेअरमन, करंजा मच्छीमार सोसायटी**

**ढगाळ वातावरणामुळे समुद्रात मासळी मिळत नाही. त्यातच समुद्रात वारंवार येणारी चक्रीवादळे यामुळे मासळी स्थलांतरीत होते. परिणामी ठरलेल्या ठिकाणी मासळी मिळत नाही.**
**-अरूण वशेणीकर, मच्छीमार, नौका तांडेल**

### व्यवसायावरील आधारित घटकही अडचणीत

***वातावरणातील बदलामुळे मच्छीमार अडचणीत सापडजा आहे. त्यामुळे मच्छीमार व्यवसायावर आधारीत खलाशी, मच्छीविक्रेते, टेम्पोचालक, जाळी व साहित्य विक्री करणारांचे व्यवसायदेखील अडचणीत आले आहेत.***

# तळोजातील दीपक नायट्राईट वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने सन्मानित

## लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोरोना काळामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल तळोजा येथील भारत सकपाळे व दीपक नायट्राईट लि. तळोजा या कंपनीची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डने नोंद घेतली असून त्यांना सर्टिफिकेट ऑफ कमिटमेंटने सन्मानित केले आहे. या बद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिनंदन केले.

तळोजा, पनवेल येथील औद्योगिक क्षेत्रातील नामवंत कंपनी दीपक नायट्राईट लि. यांनी कोरोना महामारीच्या काळात कंपनीत नियोजनबद्ध पद्धतीने कोरोना प्रतिबंधक वीस कलमी उपाययोजना सातत्याने राबविल्या. यामुळे कार्यस्थळावर शुन्य कोरोना बाधित व शुन्य मृत्यूची नोंद ठेवण्यात तसेच सर्वांची सुरक्षितता अबाधित राहून त्याचा सकारात्मक परिणाम उत्पादन प्रक्रिया सुरळीत रहाण्यावर दिसून आला. यासोबत विविध सामाजिक उपक्रम राबवून सभोवतालच्या नागरिकांचीही काळजी घेण्यात आली. या स्तुत्य उपक्रमाची वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड (लंडन) या जागतिक स्तरावरील संस्थेने नोंद घेत त्यांना सर्टिफिकेट ऑफ कमिटमेंट हा पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे.





कंपनीतील कामगार कर्मचाऱ्यांबरोबरच परिसरातील नागरिकांच्या आरोग्याच्यादृष्टीने कंपनीच्या माध्यमातून आरोग्य तथा सुरक्षा विषयक रेली, विविध परिसंवाद, प्रशिक्षण शिबिर, परिसर निर्जंतुकीकरणासाठी मोफत स्वयंचलित निर्जंतुकीकरण पंप, मोफत सॅनिटायझर द्रव, नागरिकांत मोफत मास्कचे वाटप, विभागातील गरीब व गरजू नागरिकांना धान्यांच्या पिशव्यांचे मोफत वाटप, मोफत लसीकरण तसेच लसीकरणासाठी आलेल्या नागरिकांना मोफत चहा बिस्किटे यांचे वाटप इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात आले.

# ...अन्यथा सिडकोच्या कार्यालयाला टाळे ठोकू -ॲड. मनोज भुजबळ

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील तक्रारीकडे दुर्लक्ष करणाऱ्या सिडको अधिकाऱ्यांना समज देण्यासाठी ६ डिसेंबर २०२१ रोजी नवीन पनवेल सिडको कार्यालयावर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मोर्चा नेण्यात येणार आहे. लवकरात लवकर कार्यवाही करा अन्यथा सिडकोच्या कार्यालयास टाळे ठोकू, असा इशारा भाजप ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी दिला आहे.

याबाबत सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, नवीन पनवेलमधील गार्डन व स्ट्रीट लाईट, पनवेल स्टेशन जवळील हायमास्टचे लाईट/दिवे वारंवार तक्रार अर्ज करून सुद्धा न बसवणे, नवीन पनवेल चेंबुर बँकेपासून सेक्टर १५अ पाण्याच्या टाकीपर्यंतचा रस्ता पुन्हा खोदल्यामुळे रस्त्यावर पडलेले खड्डे, कमी दाबाने येणारे पाणी व पाण्याची वेळ कमी करणे ह्या विषयांबाबत नवीन पनवेल, सिडको भवन व रायगड भवन येथील विविध सिडको कार्यालयांकडे वारंवार तक्रार अर्ज करून प्रत्यक्ष भेटून अथवा फोनवर संपर्क करून सुद्धा कोणतेही काम केले जात नाही.

**नवीन पनवेलमधील समस्यांसंदर्भात भाजप आक्रमक**

आम्ही नवीन पनवेलमधील सर्वच लोकप्रतिनिधी वारंवार अधिकारी वर्गाला विनंती अर्ज करीत असतो, परंतु आपले सर्व अधिकारी पनवेल महानगरपालहकेकडे बोट दाखवून आपले कर्तव्य नाकारण्याचा प्रयत्न करतात. पनवेल महानगरपालिकडे हस्तांतरीत आरोग्य सेवा महानगरपालिका हे योग्य प्रकारे हाताळत असून पनवेल महानगरपालिकेला त्याबद्दल महाराष्ट्रात ३ स्टार रँकिंगमध्ये २रा क्रमांक व संपूर्ण देशातील प्रथम १० मध्ये स्थान पटकावले आहे. व त्याबद्दल यांचा राष्ट्रपतींकडून सत्कार करण्यात आला आहे. हस्तांतरीत झालेल्या गार्डनची नव्याने कामे करण्यासाठी टेंडर काढलेली आहेत, परंतु सिडकोने नागरिकांना घरे बांधून विकली प्रचंड नफा कमवला. नागरिकांकडून सर्व्हीस चार्जेस घेतलेत, परंतु आता लोकांना सोई सुविधा पुरविण्यासाठी चाल ढकल करण्यात येत आहे.

याबाबत लवकरात लवकर योग्य ते आदेश द्यावेत अन्यथा ६ डिसेंबर रोजी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली नवीन पनवेलमधील सर्व लोकप्रतिनिधी यांचेकडून नवीन पनवेल सिडको कार्यालयाविरुद्ध आंदोलन करून नवीन पनवेल सिडको कार्यालयाला टाळे लावण्यात येईल व होणाऱ्या सर्व परिणामांची जबाबदारी आपल्या कार्यालयावर राहील असे पत्र सिडकोच्या व्यवस्थापकीय संचलकाना देण्यात आले आहे.

# 'स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत नागरी समस्या निवारण करा'

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत महापालिका प्रभाग ८५, ८६ मध्ये रंगरंगोटी, स्वच्छता तसेच नागरी समस्या निवारण करा, अशी मागणी महापालिका महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती आणि प्रभाग ८५च्या माजी नगरसेविका सुजाता सुरज पाटील यांनी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

महापालिका प्रभाग ८५ व ८६ मध्ये नेरूळ सेक्टर ६ , सारसोळे गाव आणि कुकशेत गाव या परिसराचा समावेश होत आहे. स्वच्छ सर्वेक्षण अंर्तगत अभियान राबविताना प्रथम प्रभाग ८५ व ८६ मधील गटारांची तळापासून स्वच्छता करून चोरीला गेलेली अथवा तुटलेली झाकणे असतील तिथे नवीन झाकणे बसवावीत. मल:निस्सारण वाहिन्यांची डागडूजी करण्यात यावी. प्रभागातील मुख्य रस्त्यावरील तसेच अंतर्गत रस्त्यावरील सर्वच सिडको, खाजगी तसेच ग्रामस्थांच्या इमारती, चाळी, इतर गृहनिर्माण सोसायट्यांच्या संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करून त्यावर स्वच्छतेविषयी तसेच आरोग्यविषयक सुभाषिते व प्रबोधनात्मक सुविचार टाकण्यात यावे. परिसरातील शाळा, नागरी आरोग्य केंद्र, समाजमंदिर, क्रिडांगण, सार्वजनिक जागा, उद्यान यांच्याही संरक्षक भिंतीची रंगरंगोटी करून त्यावरही समाजप्रबोधनात्मक सुभाषिते बसविण्याची मागणी सुजाता पाटील यांनी केली आहे.

वॉटर एंट्री अंर्तगत बाहेरील रस्ते व अंर्तगत रस्ते ज्या ज्या ठिकाणी जलवाहिन्यांचा, सोसायटीतील नळांचा दर्शनी भाग असेल त्या त्या ठिकाणी संरक्षक जाळ्या बसविण्यात याव्यात, जेणेकरून त्या ठिकाणीही बकालपणा येणार नाही व जलवाहिन्याही सुरक्षित राहतील. प्रभाग स्वच्छतेसाठी, प्रभाग ८५ व ८६ मधील सारसोळे गाव, कुकशेत गाव आणि नेरूळ सेक्टर सहा परिसराच्या सुशोभीकरणासाठी आपणास जे जे सहकार्य लागेल, ते ते सहकार्य करण्यास आपण सदैव तयार आहोत. मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत स्वच्छता अभियान, नागरी समस्यांचे निवारण, भिंतींची रंगरंगोटी, त्यावर सुभाषिते, गटारांची झाकणे आदी कामे मार्गी लावावीत, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# खारघरमधील गटारांवर झाकणे बसविण्याची मागणी


## भाजपतर्फे सिडकोकडे पाठपुरावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर परिसरात अनेक ठिकाणी गटारे खुली आहेत. तर काहींची झाकणे गायब झाल्याने अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. खुल्या गटारात पडून एखादा अपघात होऊ शकतो. सिडकोने याची दखल घेऊन गटारांवर सर्व झाकणे बसवावीत, अशी मागणी भाजपकडून होत आहे. यासंदर्भात भाजप युवा मोर्चा खारघर अध्यक्ष विनोद घरत यांनी सिडकोकडे पाठपुरावा केला होता. या संदर्भात सिडकोकडून कार्यवाही झाली नसल्याने या गटारांवर झाकणे बसविण्याची मागणी करण्यात आली आहे.

तळोजा गाव, फर्शीपाडा आणि पापडीचा पाडा या गावात मुलांना खेळण्यासाठी मैदान नाही. त्यामुळे या तीनही गावातील मुले खारघर सेक्टर ३४ लगत असलेल्या सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर आणि रस्त्यावर खेळतात, मात्र मोकळ्या रस्त्याचा कडेला गटारे खुली असल्यामुळे मुले किरकोळ जखमी झाल्याचे प्रकार घडले आहे. परिसरात क्रिकेट खेळणाऱ्या मुलांकडे विचारणा केली असता, सिडकोने दोन वर्षांपूर्वी सेक्टर ३४ मधील रस्त्याचे डांबरीकरण करताना गटारावर झाकणे बसविली होती, मात्र काही ठिकाणी गटारावरील झाकणे तुटली आहेत. तर काही ठिकाणची झाकणे काढून दुसरीकडे वापरली जात आहेत. सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांचेही याकडे दुर्लक्ष होत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे.

याबाबत सिडकोच्या खारघर कार्यालयात विचारणा केली असता, मोडकळीस आलेली गटारे दुरुस्ती केली जातील, असे सांगण्यात आले.



**इतर समस्यांमुळेही नागरिकांची गैरसोय**

***खारघरमधील उद्यानांतील खेळणीही तुटली असून त्यामुळे मुलांना इजा होण्याची शक्यता आहे. सुनियोजित शहर म्हणून नावलौकिक असलेल्या खारघर शहरातील रस्त्यांवर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. तर काही ठिकाणी पथदिवे बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. सिडकोने या समस्यांकडेही लक्ष देण्याची मागणी होत आहे.***

# उरणमधील शिवस्मारक १ डिसेंबरपासून खुले

## ▪ जेएनपीटी उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांची माहिती

**उरण : वार्ताहर**



रायगड जिल्ह्यातीलच नव्हे, तर महाराष्ट्राची शान ठरू पाहणाऱ्या उरण येथे जेएनपीटीने ३२ कोटी खर्चून उभारलेल्या लाखो दासभक्तांना उत्कंठा लागून राहिलेले ऐतिहासिक भव्य-दिव्य अस २० मीटर उंचीचे शिवस्मारक पर्यटकांसाठी १ डिसेंबरपासून खुले करण्यात येणार असल्याची माहिती जेएनपीटी उपाध्यक्ष उन्मेष वाघ यांनी दिली. हे शिवस्मारक उरण पनवेल रस्त्यावर जासईजवळ उभारण्यात आले आहे.

जेएनपीटीने उभारलेल्या शिवरायांच्या पराक्रमाची गाथा सांगणारे मेमोरियल म्युझियम शिवस्मारकाचे अडीच वर्षांपूर्वी लोकार्पण करण्यात आले आहे. विविध सुविधा असलेल्या अत्याधुनिक भव्य दिव्य स्मारकाची मागील अडीच वर्षांपासून देशभरातील शिवप्रेमी, दासभक्त, पर्यटक आणि नागरिक आदी सर्वांनाच मोठी प्रतीक्षा लागून राहिली होती.

कोविड काळात बंद ठेवण्यात आलेले २० मीटर उंचीचे बहुचर्चित शिवस्मारक पर्यटकांसह सर्वांसाठीच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला आहे. उरण तालुक्यातील जासई-दास्तानफाटा दरम्यान जेएनपीटी प्रशासनाने ३२ कोटी खर्चून १९.३ मीटरउंचीचे भव्य शिवस्मारक नऊ हजार चौरस मीटर क्षेत्रात उभारण्यात आले आहे.

पाच मजल्यांपर्यंत ७ फेब्रुवारी २०१९ रोजी या शिवस्मारकाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ज्येष्ठ निरुपणकार अप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या उपस्थितीत झाले होते. कोविडदरम्यान संग्रहालय बंद होते, मात्र १ डिसेंबरपासून हे शिवस्मारक पर्यटकांसाठी खुले करण्यात येणार आहे.

उभारण्यात आलेल्या शिवस्मारकाच्या तळमजल्यावर ४८० चौरसमीटरचा भव्य बहुउद्देशीय सभागृह आहे. या सभागृहात कॅन्टीन, ग्रीनरूम आणि संग्रहालय उभारण्यात आले आहे. या संग्रहालयात छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. पहिल्या मजल्यावर दोन खुल्या बाल्कनीमधून परिसर न्याहाळता येतो.



### भाजपकडून स्वच्छतादूतांचा सत्कार

**नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेला स्वच्छ शहर म्हणून प्रथम पारितोषिक व घनकचरा नियोजनात ५ स्टार मिळाल्याबद्दल भाजपच्या वतीने वॉर्ड अध्यक्ष ॲड. गणेश रसाळ यांनी प्रभाग क्र. ८७मधील साफसफाई कर्मचाऱ्यांचा सत्कार केला. या वेळी विनोद चिंचलीकर, हरिश्चंद्र पाटील, सिताराम गायकवाड, एकनाथ बोरगे, रामभाऊ शिरवाळे आदी उपस्थित होते.**

# 'इनरव्हील'तर्फे ज्येष्ठांसाठी योगाभ्यास कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी संधिवातावर उपयुक्त ठरणाऱ्या योगाभ्यासाची एक तासाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात बुधवारी (दि. २४) सायंकाळी ४ वाजता झालेल्या या कार्यशाळेत ज्येष्ठांचा चांगला प्रतिसाद लाभला. या कार्यशाळेत उपस्थित सदस्यांकडून खुर्चीत बसून सर्व आसने करून घेण्यात आली. सर्व सदस्यांनी फारच उत्साहाने यात सहभाग घेतला व एक तास व्यायामाचा मजेत घालवला. योग सजा नाही तर मजा आहे हे पटवून देण्यात या कार्यशाळेचा नक्कीच उपयोग होईल, असा इनरव्हीलला विश्वास वाटतो. या कार्यशाळेत एकूण १५० ज्येष्ठ नागरिकांनी आणि २० इनरव्हील सदस्यांनी उपस्थिती लावली व त्याचा लाभ घेतला.




इनरव्हीलकडून या वेळी शिकविल्या गेलेल्या आसनांच्या पुस्तिकांचे वाटपही ज्येष्ठांना करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यात ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष जोशी आणि उपाध्यक्षा शामल आंग्रे यांची उपस्थिती महत्त्वाची ठरली. इनरव्हील सदस्य ज्योत्स्ना जोशी, माला दोशी, अलका वैशंपायन, प्रभा सहस्त्रबुद्धे, शैलजा खाडिलकर आणि योगशिक्षिका गौरी अत्रे यांनी या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. त्याचप्रमाणे प्रेसिडेंट सुलभा निंबाळकर व सेक्रेटरी श्वेता वारिंगे यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संपादकीय

# न शिकलेले धडे

नैसर्गिक आपत्तींना पचवून मुंबईसारखे महानगर नेहमीच वेळ न घालवता कामाला लागते. मुंबई महानगरीचे हे वैशिष्ट्य अभिमानाने सांगितले जाते. २६/११च्या दहशतवादी हल्ल्याने मात्र मुंबईकरांची पाळेमुळे हादरली. या आकस्मिक हल्ल्यामुळे आपण सारेच प्रसंगी किती हतबल होऊ शकतो याचा अनुभव आला. गेल्या १३ वर्षांमध्ये बरेच काही बदलून गेले आहे. मुंबई महानगर परिसरातील जनजीवन वरकरणी नेहमीसारखेच राहिले असले तरी आतून कुठेतरी असुरक्षिततेची भावना घर करून राहिली आहे. त्यामुळेच या १३ वर्षांमध्ये आपण नेमके काय शिकलो हा प्रश्न पडणे सयुक्तिक ठरावे.

**तेरा वर्षांपूर्वी २६ नोव्हेंबर याच दिवशी महानगरी मुंबईने दहशतवादी हल्ल्याचा महाभयंकर अनुभव घेतला. तेरा वर्षांपूर्वीच्या मुंबईच्या त्या जखमा अजुनही भळभळत आहेत. लष्कर-ए-तयबा या दहशतवादी संघटनेच्या अतिरेक्यांना हाताशी धरून पाकिस्तानने मुंबईवरील हा भीषण दहशतवादी हल्ला घडवून आणला. या हल्ल्यात अनेक विदेशी नागरिकांचाही बळी गेला. हल्ल्याच्या भीषण स्वरुपामुळे जगभर त्याचे पडसाद उमटले. २६/११च्या हल्ल्यानंतर मुंबई पोलीस दलातील जुनाट शस्त्रे आणि गोळी प्रतिबंधक चिलखते यांच्या मर्यादा उघड झाल्या. मुंबई पोलीस किती तुटपुंज्या सामग्रीनिशी एवढे मोठे महानगर सांभाळत असतात याचा काहींना साक्षात्कार झाला. पाकिस्तानी दहशतवादी समुद्रमार्गे मुंबईच्या किनारपट्टीवर उतरले होते. या किनारपट्टीला समग्रपणे सुरक्षित ठेवणे आवाक्याबाहेरचे काम आहे हेदेखील लक्षात आले. २६/११च्या हल्ल्यानंतर सुरक्षादलांच्या पुनर्रचनेबाबत तसेच सुधारणांबाबत भरपूर चर्चा झाली. प्रत्यक्षात त्याअनुषंगाने काही किरकोळ बदल झाले. १३ वर्षांनंतरदेखील मुंबई पूर्वीप्रमाणेच रामभरोसे जगत आहे. ही आजची वस्तुस्थिती आहे. मनीष तिवारी हे काँग्रेसचे तुलनेने तरुण पिढीचे नेते आहेत. आंतरराष्ट्रीय संबंध आणि सुरक्षा व्यवस्था याबाबत त्यांचा चांगला अभ्यास असून नुकतेच त्यांनी एक पुस्तक प्रकाशित केले. गेल्या २० वर्षांतील ठळक घडामोडींचा ऊहापोह करताना या पुस्तकात त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे की, २६/११च्या हल्ल्यानंतर भारतीय सैन्यदलाने पाकिस्तानला कडवे प्रत्युत्तर द्यायला हवे होते, परंतु तसे घडले नाही. ही युपीए सरकारची दुबळी बाजू म्हणावी लागेल. काँग्रेसच्या नेत्याने काँग्रेस पक्षालाच दिलेला हा ताजा घरचा आहेर पुरेसा बोलका आहे. अर्थात मनीष तिवारी यांचे वक्तव्य काँग्रेस पक्षश्रेष्ठी फारसे मनावर घेणार नाहीत हे ओघाने आलेच, कारण काँग्रेस हाय कमांडला प्रश्न विचारणाऱ्या काही मोजक्या नेत्यांपैकी ते एक आहेत. याच मोजक्या म्हणजे २३ नेत्यांनी काँग्रेस पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांना पत्र लिहून पक्ष नेतृत्वाबद्दल गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. काही दिवसांपूर्वी याच काँग्रेस पक्षाच्या सलमान खुर्शीद यांनी राष्ट्रीय हिंदुत्ववादी संघटनांची तुलना आयसिस आणि बोकोहराम या कडव्या संघटनांशी करून वादळ उठवले होते. दहशतवादासारख्या गंभीर प्रश्नाबाबतदेखील आपल्या देशातील विरोधीपक्ष एकमुखाने बोलत नाहीत हे दुर्दैवी आहे. राजकारणामध्ये मतभेद असू शकतात, वेगवेगळ्या विचारसरणी असू शकतात. हेच लोकशाहीचे खरे सौंदर्य आहे, परंतु राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न आला की सर्वांनी एकमुखाने आणि एकदिलाने बोलले पाहिजे अशी जनतेची साधी अपेक्षा असते. २६/११च्या तेराव्या स्मृतीदिनी आपण काय धडा शिकलो याचे सिंहावलोकन सत्ताधाऱ्यांनी करायला हवे. तसेच ते मुंबईकरांनीदेखील करायला हवे.**

# शिक्षण, आरोग्य, पाणी या कामांना प्राधान्य द्या



(संग्रहित छायाचित्र)

कोरोनाच्या संकटामुळे राज्य शासनाच्या वित्त व नियोजन विभागाने जिल्हा वार्षिक निधीतील योजनांना कात्री लावण्याचा निर्णय घेतला होता. जिल्हा वार्षिक योजनेतील ३० टक्के रक्कम करोना विषयक उपाययोजनांसाठी राखीव ठेवण्यात आली होती. त्यामुळे इतर विकास कामे होत नव्हती. परंतु आता राज्य सरकारने हा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यास सुरूवात केली आहे. रायगड जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत मंजूर २७५ कोटी रुपयांचा निधी जिल्हा प्रशासनाकडे वर्ग करण्यात आला आहे. सर्व विभागांना विकासकामांची अंदाज पत्रके तयार करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे बंद असलेली विकासकामे मार्गी लागणार आहेत. कामे सुरू होतील परंतु त्यात कोणत्या कामांना प्राधान्य द्यायचे हे ठरवावे लागेल. शिक्षण, आरोग्य व पाणी या कामांना प्राधान्य द्यायला हावे. त्यासाठी निधी दिला पहिजे. निधी आला म्हणून तो शासकीय इमारती बांधण्यासाठी संपवला तर त्या कामातून कार्यकर्त्यांना पैसे मिळतील जनतेला त्याचा काहीच उपयोग होणार नाही.

रायगड जिल्ह्यासाठी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरिता राज्यसरकारने २७५ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी दिली होती. मात्र एप्रिल महिन्यापासून राज्यात करोना विषाणूचा पुन्हा प्रादुर्भाव सुरु झाला. राज्यात निर्बंध लागू करण्यात आले. जिल्हा वार्षिक योजनेतील ३० टक्के रक्कम करोनाविषयक उपाययोजनांसाठी राखीव ठेवण्यात आली होती. जिल्हा विकास योजनेतील २७५ कोटींपैकी केवळ ८९.९० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. यातील ३० टक्के निधी करोना विषयक उपाययोजनांसाठी राखीव ठेवण्याचे निर्देश असल्याने इतर विकास कामांसाठी केवळ २७.९० कोटींचा निधी शिल्लक राहिला होता. त्यामुळे विकासकामे जवळजवळ थांबली होती.

आता कोरोनाचे संकट हळूहळू कमी होऊ लागले आहे. निर्बंध उठविण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यसरकारने सर्व जिल्ह्यांना वार्षिक योजनेत मंजूर निधी पुन्हा उपलब्ध करून दिला आहे. याशिवाय आमदार स्थानिक विकास कार्यक्रम आणि डोंगरी विकास निधीही उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे जिल्हा विकास आराखड्यतील निधी अभावी रखडलेली कामे मार्गी लागणार आहेत.

शाळा इमारतींची दुरुस्ती, अंगणवाड्यांसाठी नवीन इमारतींचे बांधकाम आणि स्मशानभुमी सुधार कार्यक्रम यासारख्या नाविन्यपुर्ण योजना जिल्हा वार्षिक आराखड्यात प्रस्तावित होत्या. पण निधी आभावी ही कामे रखडली होती. रस्ते आणि साकव बांधकामे करता येत नव्हती. केवळ मदत पुनर्वसन, अन्न नागरी पुरवठा, शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन आणि वन विभागातील अत्यावश्यक कामांसाठी निधी खर्च करण्याचे निर्देश यंत्रणांना देण्यात आले होते. आता निधी उपलब्ध झाल्याने ही कामे सुरू होणार आहेत.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्हा विकास योजनेतील २७५ कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. त्यामुळे सर्व विभागांना विकास कामांची अंदाज पत्रके तयार करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आत्तापर्यंत एकूण ३६ कोटींची कामे मंजूर करण्यात आली असून यापैकी १६ कोटींची कामे पुर्ण झाली आहेत. आमदार निधीतील ३० कोटींचा निधी प्राप्त झाला आहे. हा निधी मार्च अखेरपर्यंत खर्च करायचा आहे. केवळ चार महिन्यात हा सर्व निधी संपवावा लागणार आहे. हे एक आव्हान जिल्हा प्रशासनासमोर आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनला धावपळ करावी लागणार आहे.

रायगड जिल्ह्यात नगरपंचायती, नगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणूका होणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने नगरपंचायतींच्या निवडणूका जाहीर केल्या आहेत. जिल्ह्यात माणगाव, पोलादपूर, म्हसळा, तळा, खालापूर व नव्यान निर्माण झालेली पाली या या सहा नगरपंचातींच्या निवडणूका आहेत. त्याची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी आता विकासकामांना मंजूरी देता येणार आहे. त्यांनतर नगरपालिका व जिल्हा परिषदेची निवडणूक होईल. त्याची आचारसंहिता लागेल. त्यामुळे निधी मंजूर झाला तरी आचासंहितेत नवीन कामे मंजूर करता येणार नाहीत. आचारसंहीतेच्या कचाट्यात हा निधी अडकू नये, यासाठी विकासकामांना तातडीने मंजूरी देऊन ती मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करायाला हवेत.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे रस्ते, शासकीय इमारती व समाज मंदिरे बांधणे हीच विकासकामे आहेत, हा एक गैरसमज आहे. कोरोनाने आपल्या सर्वांना चांगला धडा दिला आहे. शिक्षण, आरोग्य व पाणी या कामांना प्रधान्य द्यायला हवे. तलाठी कार्यालय नवीन बांधल्यामुळे त्या भागातील कामे वेगात होतील, असे नाही. त्यापेक्षा ज्या गावात आरोग्यसेवा नाहीत तेथे ती उपलब्ध करून दिली पाहिजे. जेथे प्रथमिक आरोग्य केंद्र आहेत तेथे चांगल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. निसर्ग व तौत्के ही दोन चक्रीवादळे येऊन गेली. त्यात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शाळा इमारती पडल्या. प्राथमिक आरोग्य केंद्रांचे नुकसान झाले. अतिवृष्टीमुळे पाणीपुरवठा योजना नादुरस्त झाल्या. त्या तातडीने दुरूस्त व्हायला हव्यात. शिक्षण, आरोग्य व पाणी या ग्रामीण भागातील प्रमुख समस्या आहेत. त्या सोडवल्या पाहिजेत. या कामांना प्राधान्य द्यायला हावे. त्यासाठी निधी दिला पहिजे. निधी आला म्हणून तो शासकीय इमारती बांधण्यासाठी संपवला तर कार्यकर्त्यांना पैसे मिळतील, जनतेला त्याचा काहीच उपयोग होणार नाही. अनावश्यक कामांवर खर्च करून शासनाचा म्हणजेच जनतेचा पैसा वाया घालविण्यापेक्षा जनतेला आवश्यक असलेल्या कामांवर हा निधी खर्च करावयाला हवा.

# माथेरानच्या दस्तुरीनाका येथील वाहनतळात चोरीच्या वाढत्या घटना

■ नगरपालिका आणि वनव्यवस्थापन समितीला जाग कधी येणार?

**कर्जत : बातमीदार**

माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरीनाका येथील एकमेव वाहनतळात एका महिन्यात चोरीच्या तीन घटना घडल्या आहेत. येथील चोरीच्या वाढत्या घटनांमुळे पर्यटक हैराण झाले असून, नगरपालिका प्रशासन आणि वन व्यवस्थापन समितीला जाग कधी येणार? असा प्रश्न ते करु लागले आहेत.



(संग्रहित छायाचित्र)

माथेरान या पर्यटनस्थळाला वरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात. माथेरानमध्ये मोटार वाहनांना बंदी आहे. त्यामुळे पर्यटकांना आपली वाहने माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरीनाका येथील वाहनतळामध्ये उभी ठेवावी लागतात. त्यासाठी वन व्यवस्थापन समिती व नगरपालिका पर्यटकांकडून प्रत्येक चारचाकी वाहनासाठी १०० रुपये आणि दुचाकी वाहनासाठी ६० रुपये कर वसुल करते.

मात्र पर्यटकांनी येथे उभ्या केलेल्या वाहनांची सुरक्षा राम भरोसे असल्याचे दिसून येत आहे. गेल्या काही दिवसांपासून येथे चोरीच्या घटनांत वाढ होत आहे. दुचाकी वाहनांमधून पेट्रोल काढले जाते तर काही वाहनांचे आरशे काढले जात आहेत. वन व्यवस्थापन समिती आणि नगरपालिकेचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे.

### घोडेवाले, रूम एजंट, कुली यांचा वाढता वावर

पर्यटक दस्तुरी येथील वाहनतळात आपले वाहन घेऊन येतात. मात्र वाहनतळात यायच्या अगोदरच घोडेवाले, रूम एजंट, कुली, हातरिक्षावाले हे पर्यटकांच्या वाहना मागे धावत सुटतात. वाहनतळात उतरत नाही, तोच घोडेवाले, रूम एजंट, कुली यांचा गराडा घालतात. जो तो आपल्या धंद्याची जाहिरात करावयास लागतो. त्यांना जाहिरातीसाठी वाहनतळात कोण प्रवेश देतो असा प्रश्न येथील स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

### पोलीस कारवाईची गरज

घोडेवाले, रूम एजंट, हातरिक्षावाले, कुली हे राजरोसपणे या वाहनतळात वावरत असतात.एका वेळेस फक्त पाच घोडेमालक वाहनतळात येतील. जर जास्त घोडेवाले आढळले तर कारवाई करण्यात येईल, असे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी निर्देश दिले होते. मात्र घोडेवाले आणि रूम एजंट यांच्याकडून पोलिसांना वाटण्याच्या अक्षदा दाखवल्या जात आहेत. या वाहनतळाच्या बाहेर पोलीस चौकी आहे पण रात्रीच्या वेळेस तिथे पोलीस कर्मचारी नसतात.

**"गेल्या काही दिवसांपासून वाहनतळात उभ्या असलेल्या वाहनांतून पेट्रोल, आरशे, टायर चोरीस जाण्याच्या घटना वाढल्या आहेत. त्याबाबत वन व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे. वाहनतळातील पथदिवे बंद आहेत ते सुरू करावेत, अशी मागणी नगरपालिकेकडे पत्राद्वारे केली आहे.**
**-योगेश जाधव, अध्यक्ष,**
**वन व्यवस्थापन समिती, माथेरान**

### वाहनतळातील पथदिवे बंद

सध्ये एमएमआरडीएकडून वाहनतळाचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. त्यामध्ये त्यांनी विजेचे खांब लावून वीज पुरवठा व्यवस्थित सुरू होता. पण काही दिवसांपासून वाहनतळाच्या काही भागातील वीजेचे दिवे बंद आहेत.

### सीसीटीव्ही बसविण्याची मागणी

या वाहनतळामध्ये वन व्यवस्थापन समितीने सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते. पण सुशोभीकरणाचे काम सुरू झाल्यानंतर येथील सीसीटीव्ही कॅमेरे काढून टाकण्यात आले होते, ते कॅमेरे सध्या वन व्यवस्थापन कर कार्यलयातील कपाटात पडून आहेत.



# कर्जत भाजपतर्फे आंबोट येथे मोफत आरोग्य शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

भारतीय जनता पक्ष कर्जत मंडळ आणि तेरणा मेडिकल रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील आंबोट येथे मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. भाजप किसान मोर्चाचे कोकण विभाग संघटक सुनील गोगटे यांच्या विशेष प्रयत्नाने घेण्यात आलेल्या या शिबिराचा लाभ पोटल, पाली, आंबोट येथील १५२ ग्रामस्थांनी घेतला.

या आरोग्य शिबिरात तज्ज्ञांकडून विविध तपासण्या करण्यात आल्या. त्यातील सुमारे बावीस लोकांना विविध उपचार करण्यासाठी नवी मुंबईतील तेरणा हॉस्पिटल नेण्यात येणार आहे. तेथे त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.

भाजपचे सुनील गोगटे, मिनेश मसणे, स्नेहा गोगटे, वैभव मसणे, नरेश मसणे, संदीप मसणे, पंकज मसणे, नवनीत मसणे, प्रथमेश मसणे, समाधान मसणे, मनोहर मुकणे, प्रफुल मसणे, रवींद्र कोळंबे, प्रकाश मसणे, सचिन मसणे राहुल मसणे, सर्वेश गोगटे यांच्यासह ग्रामस्थ रामदास मसणे, दत्ता मसणे, सदाशिव मसणे, सरदार मसणे, सुरेश वालकू मसणे, भगवान मसणे, मनोहर मसणे शांताराम मसणे, प्रल्हाद शंकर मसणे, रामभाऊ मसणे, अनंता सोनावले, सागर मसणे या शिबिराला उपस्थित होते.

# सुधागडात क्षयरुग्ण शोधमोहिमेस प्रारंभ

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात क्षयरुग्णांना शोधण्यासाठी आरोग्य विभागाने आदिवासी आणि ग्रामीण भागात विशेष सक्रिय क्षयरुग्ण शोधमोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेदरम्यान आरोग्य पथक घरोघरी जाऊन संशयित क्षयरुग्णांचा शोध घेणार आहेत. संशयित रुग्णांना तपासणीसाठी आरोग्य केंद्रात आणून त्यांच्यावर औषधोपचार करण्यात येणार आहेत.

समुदाय वैद्यकिय अधिकारी, आशा, स्वयंसेवक, आरोग्य सेवक, सेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहाय्यीका यांचे आरोग्य पथक घरोघरी जाऊन संशयित क्षयरुग्णांचा शोध घेणार आहेत. लक्षणे असणाऱ्या संशयित रुग्णांची माहिती घेऊन त्यांना जवळच्या आरोग्य संस्थेत नेवून तपासणी केली जाणार आहे. त्या रुग्णांचे थुंकी नमुने तपासणीसह एक्स-रे मोफत काढले जाणार आहेत. ज्यांचे तपासणी निष्कर्ष अहवाल क्षयरोगासाठी पॉझिटिव्ह येईल त्यांच्यावर ६ ते ८ महिन्यांपर्यंत औषधोपचार करण्यात येणार आहे. रुग्णाला प्रति महिन्याला ५०० रुपये भत्ताही दिला जाणार आहे. अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी आणि वैद्यकीय अधिकारी सायली मानकर यांनी दिली.

दोन आठवड्याहुन आधिक कालावधीचा खोकला, ताप, वजनात लक्षणीय घट, भुक मंदावणे, मानेवर गाठी येणे, थुंकीवाटे रक्त येणे अशी या आजाराची प्रमुख लक्षणे असून नागरिकांनी दक्ष व सजग राहून वेळीच उपचारासाठी पुढे येण्याचे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे.

# पालीच्या बल्लाळेश्वराची माहिती आता एका क्लिकवर; वेबसाईटचे अनावरण




(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्रापैकी पालीतील बल्लाळेश्वर मंदिराची व देवस्थान ट्रस्टच्या उपक्रमांची इतंभूत माहिती आता एका क्लिकवर मिळणार आहे. मंगळवारी (दि. २३) सायंकाळी अंगारकी चतुर्थीच्या दिवशी प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्रीराम सबनीस यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत पालीतील भक्तनिवासात या वेबसाईटचे अनावरण करण्यात आले. ही वेबसाईट सुयोग वझे यांनी तयार केली आहे.

मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवपदी नियुक्ती झाल्याबद्दल प्रा. सुधीर पुराणिक यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. धनंजय धारप, उपाध्यक्ष विनय मराठे, विश्वस्त माधव साने, उपेंद्र कानडे, सचिन साठे, राहूल मराठे, प्राचार्या डॉ. अंजली पुराणीक आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय गद्रे यांनी केले.

**ट्रस्टच्या माध्यमातून अनेक लोकाभिमुख, सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. गरजू लोकांना, रुग्णांना व विद्यार्थ्यांना वस्तू, धान्य, सेवा व आर्थिक स्वरूपात मदत केली जात आहे. ही माहिती वेबसाईटच्या माध्यमातून दाते व भाविकांपर्यंत पोहोचेल तसेच आगामी उपक्रमदेखील लोकांना कळतील.**
**-ॲड. धनंजय धारप, अध्यक्ष,**
**बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली**

# ओबीसी जागर अभियान रथयात्रेचे खोपोली, कर्जत, नेरळमध्ये स्वागत





(छाया : संतोष पेरणे)

**खोपोली : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसी समाज आरक्षणापासून वंचित राहत आहे, या पार्श्वभूमीवर भाजपच्या ओबीसी सेलच्या वतीने ओबीसी जागर अभियान रथाचे आयोजन करण्यात आले आहे. या रथाचे बुधवारी (दि. २४) सायंकाळी खोपोलीच्या शिळफाटा येथे आगमन झाले. माजी नगराध्यक्ष सोहनराज राठोड यांनी या रथाचे स्वागत केले.

राज्यातील ठाकरे सरकारच्या हलगर्जीपणामुळे ओबीसी समाज आरक्षण व विविध योजनांपासून वंचीत राहिला आहे. समस्त ओबीसी समाजाने याचा निषेध करून आगामी निवडणुकांमध्ये या राज्य सरकारला घरचा रस्ता दाखववा, असे आवाहन भाजप ओबीसी मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष राजेश गायकर यांनी या वेळी केले.

भाजप ओबीसी मोर्चाचे खोपोली शहर अध्यक्ष सुनिल नांदे, भाजप खोपोली शहर सरचिटणीस हेमंत नांदे, उपाध्यक्ष दिलीप पवार, चिटणीस प्रमोद पिंगळे, गोपाळ बावस्कर, कोषाध्यक्ष राकेश दबके, वैद्यकीय सेलचे अध्यक्ष डॉ. बबन नागरगोजे, निलेश मांगले, महिला मोर्चा शहराध्यक्षा शोभा काटे, रसिका शेटे, सुनिती महर्षी, गीता मोहिते, अमृता नांगरे, सीमा मोगरे, अश्विनी अत्रे, ओबीसी नेते सचिन मोरे, कामगार आघाडीचे सूर्यकांत देशमुख, व्यापारी सेलचे कीर्ति ओसवाल, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अजय इंगुळकर, पदाधिकारी पुनीत तन्ना, विनायक मंडपे, सिद्धेश पाटील, संतोष लोहार, सागर काटे, अनिल कर्णूक, प्रमोद वाघ, प्रदीप दळवी, माजी नगरसेवक अनिता शाह इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. या रथयात्रेद्वारे खोपोली शहराच्या विविध भागात जनजागरण करण्यात आले.

**कर्जत : बातमीदार**

भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी जागर अभियान रॅलीचे कर्जत शहर आणि नेरळ गावात स्वागत करण्यात आले. कर्जत येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे तर नेरळ गावातील हुतात्मा हिराजी पाटील चौकात या रॅलीचे भाजप कार्यकर्त्यांनी स्वागत केले.

भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष योगेश टिळेकर यांनी राज्यातील ओबीसी आरक्षण वाचावे आणि ओबीसी समाजाला राजकीय आरक्षण मिळावे यासाठी ओबीसी आरक्षण जागर अभियान रॅली काढली आहे. या रॅली दरम्यान, ओबीसी समाजासाठी भाजप सरकारने काय केले, याची माहितीपत्रके वाटली जात आहेत. तसेच भाजपच्या नेत्यांनी केलेल्या भाषणांची ध्वनीचित्रफीत दाखवली जात आहे.

कर्जत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे रॅली पोहचली त्यावेळी भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेरळ येथे भाजप आणि ओबीसी समाजाच्या कार्यकर्त्यांनी या रॅलीचे जोरदार स्वागत केले. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी हुतात्मा हिराजी पाटील आणि भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नामफलकांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, जिल्हा चिटणीस रमेश मुंडे, कर्जत तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, उपाध्यक्ष सचिन म्हसकर, सरचिटणीस संजय कराळे, युवानेते किरण ठाकरे, नितीन कांदळगावकर, संदीप म्हसकर, ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष दशरथ वेहले, दशरथ पोसोटे, शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, सरचिटणीस प्रकाश पालकर, नगरसेविका स्वामिनी मांजरे, माजी नगरसेविका बिनिता घुमरे यांच्यासह योगेश ऐनकर, निखील ऐनकर, प्रकाश पेमारे, मारूती जगताप, दिनेश भरकले, अनिल पटेल, प्रवीण गायकवाड, हर्षल कुलकर्णी, हेमंत मेस्त्र, प्रज्ञेश खेडकर, राहुल मुकणे, अक्षय पेमारे, कौस्तूभ टिल्लू, पप्या जैन, उमेश भागीत, प्रणित ढोले, गमन ऐनकर यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अवकाळी पावसाने वैरणीचा प्रश्न ऐरणीवर

### ■ पेंढा भिजल्याने मुक्या जनावरांचे हाल, बळीराजा चिंतातूर

**पाली : प्रतिनिधी**

अवकाळी व परतीच्या पावसाने भात पिकाचे नुकसान केले. तसेच झोडणी व मळणीनंतर शेतात रचलेला पेंढादेखील भिजविला. कुजलेला आणि बुरशी आलेला हा पेंढा जनवारांच्या खाण्यायोग्य राहिला नाही. त्यामुळे मुक्या जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

सुधागड तालुक्यातील बहुतांश ठिकाणी मागील आठवड्यात अवकाळी व परतीचा पाऊस पडला. काही शेतकऱ्यांनी भात सुरक्षित ठिकाणी ठेवला असला तरी गुरा-ढोरांच्या चाऱ्यासाठीचा पेंढा/पेंढ्याच्या गंजी मात्र शेतातच ठेवल्या होत्या. अवकाळी पावसाने शेतात आणि मांडवावर ठेवलेला सर्व पेंढा भिजला. तो आता कूजू लागला असून त्यावर काळी बुरशी येऊ



(छाया : धम्मशील सावंत)

लागली आहे. त्यामुळे हा कुजलेला पेंढा गुरा-ढोरांना खाण्यालायक राहिलेला नाही. दुभत्या जनावरांना आणि ढोरांना खायला काहीच राहिले नसल्याने काही दिवसांतच जनावरांवर उपासमारीची

> **जनावरांसाठी ठेवलेला पेंढा अवकाळी पावसाने भिजून खराब झाला. आता जनावरांच्या चाऱ्याची सोय कशी करायची हाच प्रश्न डोळ्यासमोर आहे. गुरे ढोरे टिकली तरच उदरनिर्वाह चालणार आहे. याबाबत सरकारने काहीतरी नुकसान भरपाई द्यायला पाहिजे.**
> **–हुसेन मोमीन,**
> **शेतकरी, पाली, ता. सुधागड**

वेळ येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. अनेक शेतकऱ्यांना परिस्थितीमुळे पेंढा विकत आणणेदेखील शक्य नाही तसेच सर्वत्रच पाऊस झाल्याने पेंढा उपलब्ध होणे अवघड झाले आहे. शिवाय पेंढ्याच्या किंमतीदेखील वाढू शकतात. त्यामुळे बळीराजा चिंतातूर झाला आहे.

## रावे गावाचे नंदनवन करणार –वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील यांची जन्मभूमी असलेल्या रावे गावाचे नंदनवन करणार असल्याची ग्वाही रायगड जिल्हा परिषदेचे माजी विरोधीपक्ष नेते तथा भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी गुरुवारी (दि. २५) रावे येथे दिली.

आमदार रविशेठ पाटील यांच्या स्थानिक विकास निधीतून दहा लाख रुपये खर्चून रावे गावातील मराठी शाळा ते रायबादेवी मंदिर या अंतर्गत रस्त्याचे भूमिपूजन वैकुंठ पाटील यांच्या हस्ते गुरुवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार रविशेठ पाटील यांनी रावे गावासाठी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला असल्याचे वैकुंठ पाटील यांनी यावेळी सांगितले.



(छाया : अनिस मनियार)

आमदार रविशेठ पाटील यांनी रावे गावातील खाडीकिनाऱ्यावरील शेतीचे नुकसान थांबविण्यासाठी पूरनियंत्रक संरक्षक भिंतीसाठी १७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. गावातील तलाव सुशोभीकरणसाठी २५ लाख, स्मशानभूमी रस्तासाठी १० लाख, रायबादेवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी पाच लाख, अस्थीविसर्जन घाटसाठी १० लाख, मच्छी सुकणाविण्याच्या ओट्टयासाठी पाच लाख, टाकपाडा आळी येथील सार्वजनिक शौचालयसाठी पाच लाख, समाज मंदिरसाठी १० लाख असा एकूण एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. या विकास कामामुळे रावे गावचे नक्कीच नंदनवन होईल, असा विश्वास वैकुंठ पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

परिसरातील दादर गावासाठीदेखील सुमारे एक कोटी रुपयांची विकासकामे करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

सरपंच संध्या पाटील, माजी उपसरपंच राजश्री पाटील, ग्रामपंचायत सदस्य सरिता पाटील, धनाजी पाटील, प्रदीप पाटील, अजित पाटील, राजन पाटील, किशोर पाटील, योगेश पाटील, निवृत्ती पाटील यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

## संविधानाचा आदर : भारतीयांचे कर्तव्य

स्वतंत्र भारताने ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. २०२१ हे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव वर्ष म्हणून देशभरात साजरे केले जात आहे. केंद्र शासनाने आझादी का अमृत महोत्सव ही टॅग लाईन वापरून हा महोत्सव साजरा करण्यासाठी विविध योजना राबविल्या आहेत. महाराष्ट्रातसुध्दा हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी विविध प्रसार माध्यमांमधून प्रचार व प्रसिध्दी दिमाखाने केली जात आहे. राज्यात हा महोत्सव एका विशेष शैलीत आणि व्यापक स्वरुपात साजरा होताना दिसत आहे.




देशाच्या स्वतंत्र्याची ही ७५ वर्ष यशस्वीरित्या पूर्ण होण्यामागे भारतीय संविधानाचा सिंहाचा वाटा आहे. संविधान नसते तर? हा प्रश्न जरी मनात आला तरी अंगावर काटा उभा राहतो. याचे कारण आज आपण अफगाणिस्तानसारख्या देशाची परिस्थिती पाहिलीच आहे. संविधान नसते तर स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी गाठताच आली नसती, हे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यामुळे आजचा संविधान दिन प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाचा आणि महत्त्वाचा आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी आणि संविधानाच्या महात्म्याची भारतीयांना जाणीव राहावी या उद्देशाने २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्यात येतो. २६ नोव्हेंबर १९४९ आणि २६ जानेवारी १९५० भारतीय इतिहासातील या दोन महत्त्वाच्या तारखा आहेत. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी आपण संविधानाचा स्वीकार केला होता, तर २६ जानेवारी १९५० रोजी हे संविधान संपूर्ण देशभर लागू करण्यात आले.

दुसऱ्या महायुध्दानंतर जुलै १९४५ साली ब्रिटीश सरकारने भारताबद्दल त्यांची पुढची रणनिती काय असेल, याची घोषणा केली. १५ ऑगस्ट १९४७ साली देश स्वतंत्र झाल्यानंतर संविधान निर्मितीबाबतच्या सभांना सुरुवात झाली. दोन वर्षे ११ महिने १८ दिवस चर्चा, वादविवाद करून एकूण १२ अधिवेशने घेण्यात आली. यासाठीदेखील निवडणूका घेण्यात आल्या. संविधान सभेच्या पहिल्या बैठकीनंतरच भारत आणि पाकिस्तानची विभागणी झाली. त्यामुळे संविधान सभादेखील दोन भागात विभागली गेली. भारताची संविधान सभा आणि पाकिस्तानची संविधान सभा असे संविधान सभेचे दोन भाग झाले. भारताचे संविधान लिहिणाऱ्या सभेमध्ये २९९ सदस्य होते. आणि सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद हे होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रारुप समितीचे अध्यक्ष होते. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे व विस्तृत संविधान आहे. यामध्ये २५ भाग, ४४८ अनुच्छेद आणि १२ परिशिष्ट आहेत. मूळ संविधानात ३९५ आर्टिकल्स आणि नऊ परिशिष्ट होते. संविधानातील बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टी व घटना इतर देशांच्या संविधानातून घेण्यात आल्या आहेत.

संविधानाबाबत अनेक आश्चर्यकारक गोष्टी आहेत. संविधान लिहिण्यासाठी कोणतेही यांत्रिकी साधन वापरले गेले नाही. संपूर्ण संविधान हे हस्तलिखित आहे. दिल्लीतील प्रेम बिहारी नारायण रायजादा यांनी स्वत:च्या हातांनी इटालिक शैलीत संपूर्ण संविधान हे प्रचंड पुस्तक लिहिले आहे. प्रेम बिहारी हे त्याकाळातील सुप्रसिध्द सुलेखन लेखक होते. त्यांचे आजोबा रामप्रसाद सक्सेना कॅलिग्राफर होते. ते पर्शियन व इंग्रजी भाषेचे अभ्यासक होते. स्वातंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना संविधान हे प्रिंटऐवजी हस्तलिखित सुलेखात हवे होते. पं. नेहरूंनी प्रेम बिहारी यांना संविधान तिरक्या (खींरश्रळल डर्शीींशी) शैलीत लिहिण्यास विनंती केली. आणि या लिखाणाबद्दल ते किती फी घेणार असे विचारले. प्रेम बिहारी यांनी नेहरूजींना सांगितले एक पैसाही घेणार नाही. देवाच्या कृपेने माझ्याकडे सर्व गोष्टी आहेत आणि मी माझ्या आयुष्यात आनंदी आहे. त्यांनी नेहरूजींना विनंती केली की, माझी एक अट आहे, घटनेच्या प्रत्येक पानावर मी माझे नाव लिहीन आणि शेवटच्या पानावर माझ्या आजोबांच्या नावाबरोबर माझे नाव लिहीन. नेहरूजींनी त्यांची विनंती मान्य केली. ही घटना लिहिण्यासाठी त्यांना घर देण्यात आले होते. तिथे बसून प्रेमजींनी संपूर्ण घटनेचे हस्तलिखाण केले. शांतिनिकेतनमधील नंदलाल बोस आणि त्यांच्या काही विद्यार्थ्यांनी संविधानातील रिक्त जागा निर्दोष प्रतिमांनी भरल्या. मोहनजो दारो, रामायण, महाभारत, गौतम बुद्धांचे जीवन, सम्राट अशोक, बौद्ध धर्म, विक्रमादित्य, सम्राट अकबर व मुघल साम्राज्याची बैठक, महाराणी लक्ष्मीबाई, टीपू सुलतान, गांधीजींची चळवळ, नेताजी सुभाषचंद्र बोस हे सर्व प्रतिबिंबित आहेत. एकूणच हे भारताच्या इतिहासाचे आणि भूगोलाचे प्रतिबिंब आहे. घटनेतील मजकूर आणि परिच्छेदांनुसार त्यांनी चित्रे अतिशय विचारपूर्वक रंगविली आहेत.

संपूर्ण भारतीय संविधान घटनेची हस्तलिखित सहा महिने सभागृहात एका खोलीत लिहिण्यात आली. एक संविधान लिहिण्यासाठी २५१ पानांच्या चर्मपत्र कागदाचा (झरीलहाशपीं झरशी) वापर करावा लागला. घटनेचे वजन तीन किलो ६५० ग्रॅम आहे. घटना २२ इंच लांबी आणि १६ इंच रुंद आहे. प्रेम बिहारी यांचे १७ फेब्रुवारी १९८६ रोजी निधन झाले. भारतीय राज्यघटनेचे मूळ पुस्तक आता दिल्लीच्या संसद भवन ग्रंथालयात जतन केले गेले आहे. नंतर, संविधानाची काही पुस्तके देहरादूनमधील सर्व्हे ऑफ इंडियाच्या देखरेखीखाली छापण्यात आली आहेत.

संविधानाचा आदर, सन्मान करणे हे प्रत्येक भारतीयाचे प्रथम कर्तव्य आहे. आज २६ नोव्हेंबर हा संविधान दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा होत आहे. चला तर, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान दिन जल्लोशात साजरा करूया!

**–प्रविण डोंगरदिवे,**
माहिती सहाय्यक
कोकण विभाग, नवी मुंबई

## मुरूडमधील टपरीधारकांना दिलासा

### भाडे माफ कराण्याचे उपविभागीय अधिकाऱ्यांचे आदेश

**मुरूड : प्रतिनिधी**

निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील टपरीधारकांचे वार्षिक भाडे नगर परिषदेने माफ करावे, असे आदेश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. त्यामुळे या टपरीधारकांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

मुरूड समुद्रकिनारी असलेल्या ४४ टपरीधारकांचे निसर्ग चक्रीवादळात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शासनातर्फे नुकसानग्रस्त टपऱ्यांचे पंचनामे केले गेले. मात्र त्यांना अद्याप कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळालेली नाही. या संदर्भात पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर यांनी मुख्यमंत्र्यांसह जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासन यांच्याकडे अर्ज, विनंत्या करून लक्ष वेधले. मात्र शासनातर्फे काहीही मदत मिळाली नाही. नगर परिषदेने टपरीचे वार्षिक भाडेतरी माफ करावे, अशी मागणी मंडळातर्फे करण्यात आली होती. या संदर्भात नुकतीच मुरूड तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांच्या अध्यक्षतेखाली संबंधीतांची बैठक घेण्यात आली. नायब तहसीलदार रवींद्र सानप, मुख्याधिकारी पंकज भुसे, मंडळाचे अध्यक्ष अरविंद गायकर, दिव्या सतविडकर, दामोदर खारगावकर, महेंद्र पाटील, देवेंद्र सतविडकर, तन्वी भायदे, दीपक जोशी, शकील शाबान, निर्मला सतविडकर आदी या बैठकीला उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी प्रशांत ढगे यांनी या बैठकीत टपरीधारकांच्या समस्या जाणून घेतल्या व या टपरीधारकांचे वार्षिक भाडे नगर परिषदेने ठराव घेऊन शंभर टक्के माफ करावे, असे आदेश दिले.


**पनवेल महानगरपालिका**

जा.क्र. पमपा/सचिव/२०-२१/प्र.क्र.१५/१८६/२१ दिनांक :- २५/११/२०२१

**पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा**
**सूचना क्रमांक १२, दिनांक ३०/११/२०२१**

पनवेल महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार, दिनांक ३०/११/२०२१ रोजी ११:३० वाजता पनवेल महापालिकेचे आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठक खालील विषयावर विचारविनिमय करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी, सदर बैठकीस उपस्थित रहावे.

**मंगळवार, दिनांक ३०/११/२०२१/२०२१ रोजी ची**
**विशेष सर्वसाधारण सभेची**
**विषय पत्रिका**

**मा. आयुक्त महोदयांकडील कार्यालयीन कामकाज**

१. स्थायी समिती सभा दिनांक, २४/११/२०२१ रोजी मंजुर झालेला पनवेल महानगरपालिकेचा आर्थिक वर्ष सन २०२०-२१ चे व सुधारित सन २०२१-२२ चे मुळ वार्षिक अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत विचार करुन निर्णय घेणे.

(मा. महापौर महोदय यांचे मंजुरीने व आदेशान्वये)
दिनांक :- २५/११/२०२१

**सही/-**
**(तिलकराज खापर्डे)**
नगर सचिव (प्र.),
पनवेल महानगरपालिका, पनवेल

भारत-न्यूझीलंड कसोटी

# पहिल्या दिवसअखेर भारताच्या ४ बाद २५८ धावा

**कानपूर : वृत्तसंस्था**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात कानपूरच्या ग्रीन पार्क मैदानावर पहिली कसोटी आज गुरुवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवसअखेर भारताच्या ४ बाद २५८ धावा झाल्या आहेत. या सामन्यात भारताचा कर्णधार अजिंक्य रहाणे याने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पहिला बळी लवकर गेल्यानंतर शुभमन गिल आणि चेतश्वर पुजार यांनी डाव थोडा सावरला. पण भारताची अवस्था ४ बाद १४५ अशी बिकट झाली होती. या परिस्थितीतून संघाला बाहेर काढण्याचे काम केले ते पदार्पण करणाऱ्या मुंबईच्या श्रेयस अय्यरने.

नाणफेक जिंकून फलंदाजी करण्याचा चांगला निर्णय अजिंक्यने घेतला असला तरी भारताला चांगली सुरुवात करता आली नाही. सलामीवीर मयांक अग्रवाल फक्त १३ धावांवर



बाद झाला. त्यानंतर शुभमन गिल आणि पुजार यांनी दुसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागिदारी केली. ही जोडी मोठी धावसंख्या करेल असे वाटत असताना गिल अर्धशतकानंतर बाद झाला. त्यानंतर संघाचे शतक पूर्ण झाल्यावर पुजारा देखील २६ धावांवर माघारी परतला. तर कर्णधार अजिंक्य रहाणे सेट होतोय असे वाटत असताना ३५ धावांवर बाद झाला. यामुळे भारताची अवस्था ४ बाद १४५ अशी झाली होती. भारताच्या चार पैकी ३ विकेट कायले जेमिन्सनने घेतल्या होत्या.

रहाणे बाद झाल्यानंतर रवींद्र जडेजा फलंदाजीला आला. त्याच्यासोबत होता पहिली कसोटी खेळणारा श्रेयस अय्यर. भारताच्या डावाची सर्व मदार या दोघांवर होती. पहिली कसोटी खेळणाऱ्या श्रेयसने चाहत्यांना आणि भारतीय संघ व्यवस्थापनाला निराश केले नाही. पदार्पणाच्या सामन्यात अर्धशतक झळकावण्याचा विक्रम त्याने केला. याचबरोबर संकटात असलेल्या संघाला बाहेर काढले. अय्यरच्या अर्धशतकामुळे भारताने २०० धावांचा टप्पा पार केला. त्याने जडेजासोबत अर्धशतकी भागिदारी करून टीम इंडियाला समाधानकारक स्थितीत पोहोचवले.

सामना सुरू होण्याआधी भारताचे माजी कर्णधार आणि दिग्गज फलंदाज सुनील गावस्कर यांनी श्रेयसला कसोटीची कॅप दिली. भारतीय क्रिकेटच्या दिग्गजांकडून नवीन खेळाडूंना ही प्रतिष्ठित कॅप देण्याची जुनी परंपरा मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी पुन्हा सुरू केली आहे. याआधी टी-२० मालिकेदरम्यानही द्रविडने हर्षल पटेलकडे राष्ट्रीय संघाची कॅप सोपवण्यासाठी मर्यादीत षटकाच्या क्रिकेटमधील भारताचा सर्वात यशस्वी गोलंदाजांपैकी एक असलेल्या अजित आगरकरला बोलावले होते.

इंडोनेशिया खुली बॅडमिंटन स्पर्धा

## सिंधू, श्रीकांत यांची विजयी सलामी

**बाली : वृत्तसंस्था**

दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू, किदम्बी श्रीकांत आणि बी. साईप्रणीत या भारतीयांनी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत विजयी सलामी दिली.


महिला एकेरीत सिंधूने पहिला गेम गमावल्यावर दमदार पुनरागमन करताना जपानच्या अया ओहोरीला १७-२१, २१-१७, २१-१७ असे पराभूत केले. सिंधूचा दुसऱ्या फेरीत २३ वर्षीय जर्मन खेळाडू यव्होने लिसोबत सामना होईल.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत श्रीकांतने भारताच्याच एच. एस. प्रणॉयवर २१-१५, १९-२१, २१-१२ अशी सरशी साधली. दुसरीकडे, प्रणीतने फ्रान्सच्या तोमा ज्युनियर पोपोव्हचा २१-१९, २१-१८ असा सरळ गेममध्ये पराभव केला. पुढील फेरीत त्याच्यापुढे ख्रिस्टो पोपोव्हचे आव्हान असेल. मिश्र दुहेरीत एन सिक्की रेड्डी आणि ध्रुव कपिला या जोडीवर पहिल्या फेरीत जपानच्या क्योही यामाशिता आणि नारु शिनोयाने ७-२१, १२-२१ अशी मात केली. रेड्डीला अश्विनी पोनप्पासह खेळताना महिला दुहेरीतही पराभव पत्करावा लागला.

आरोग्य प्रहर

## व्हिटॅमिन सी म्हणजे निरोगी जीवनाची गुरुकिल्ली

निरोगी शरीर ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे सर्वात महत्त्वाची भूमिका बजावतात. आपल्या शरीराला प्रत्येक जीवनसत्त्वाची गरज असते. ही जीवनसत्त्वे अन्नाद्वारे शरीराला मिळतात. व्हिटॅमिन सी हे एक असे जीवनसत्व आहे, जे आपल्या निरोगी शरीरासाठी आणि आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. शरीरात कोलेजनच्या योग्य निर्मितीसाठी व्हिटॅमिन सी आवश्यक आहे. हाडांच्या विकासासाठी, रक्तवहिन्यासंबंधी आरोग्य आणि जखमेच्या उपचारांसाठी हे महत्त्वाचे आहे.





व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे हिरड्या दुखणे, हिरड्यांमधून रक्त येणे, अशक्तपणा, थकवा, पुरळ आणि बऱ्याच समस्या निर्माण होऊ शकतात. मात्र, व्हिटॅमिन सीच्या कमतरतेमुळे थकवा, भूक न लागणे, चिडचिडा स्वभाव आणि सांधेदुखी यांसारखी अनेक लक्षणे दिसू शकतात. यामुळे आपल्या दररोजच्या आहारामध्ये व्हिटॅमिन सीचा समावेश करावा.

आपल्या आहारात व्हिटॅमिन सी समाविष्ट करणे खूप महत्त्वाचे आहे. इतर फायद्यांमध्ये व्हिटॅमिन सी लोह शोषून घेण्यास मदत होते. जे तुमच्या शरीरातील लाल रक्तपेशींच्या संख्येत घट झाल्यामुळे होणारे अशक्तपणा दूर करण्यास मदत करते. अशक्तपणामुळे थकवा, निस्तेज त्वचा, धाप लागणे, चक्कर येणे, वजन कमी होणे यासारख्या समस्या निर्माण होतात.

लिंबू, संत्री आणि मोसंबी यांचा समावेश आपल्या आहारात करा. कारण यामध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात आढळते. लिंबामध्ये 'व्हिटॅमिन सी'ची उपलब्धता जास्त असल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास त्याचा चांगला उपयोग होतो. लिंबू सेवनामुळे रक्त शुद्धीकरणासाठी मदत होते. मोसंबीमध्ये व्हिटॅमिन सी चांगल्या प्रमाणात आढळते.

लाल शिमला मिरचीमध्ये जीवनसत्त्वे सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन के, फायबर आणि बीटा कॅरोटीन यामध्ये भरपूर प्रमाणात आढळतात. लाल शिमला मिरचीमध्ये कॅलरी मोठ्या प्रमाणात असतात, त्यामुळे कोलेस्टेरॉल वाढत नाही. व्हिटॅमिन सीचे सेवन रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. कोलेस्टेरॉलची पातळी कमी करून रोग प्रतिकारशक्ती वाढविण्यात मदत होते.

## गौतम गंभीरला धमकी देणारा ई-मेल पाकिस्तानातून



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी क्रिकेटपटू आणि भाजप आमदार गौतम गंभीरला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. हा धमकीचा मेल पाकिस्तानातून आला होता, अशी माहिती समोर आली आहे. गंभीरनेच यासंदर्भातील तक्रार पोलिसांकडे केली होती. दोन वेळा गौतम गंभीरला धमकी देण्यात आली.

गौतम गंभीरला हा धमकीचा मेल पाकिस्तानातून आला होता. गौतम गंभीरने आरोप केला होता की, त्याला आयएसआयएस काश्मीरकडून जीवे मारण्याच्या धमक्या आल्या होत्या, पण ज्या सिस्टीमद्वारे हा मेल पाठवला गेला त्याचा आयपी अ‍ॅड्रेस पाकिस्तानमध्ये सापडला आहे. दिल्ली पोलिसांनी गुगलकडून माहिती मागवली होती.

## खेलो इंडिया युथ गेम्स : जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धांना सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या वतीने जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन पनवेल येथे करण्यात आले. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील १८ वर्षाखालील मुलांच्या एकूण १६ संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय धावपटू तथा प्रांताधिकारी उरण ललिता बाबर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.





या वेळी ललिता बाबर यांनी उपस्थित खेळाडूंना मार्गदर्शन करताना खेळाडूंनी आपल्या खेळांमध्ये प्रामाणिक कष्ट घ्यावे, तसेच खेळांमधील जय-पराजय हे खिलाडू वृत्तीने स्वीकारावेत. पराजित झालेल्या खेळाडूंनी निराश न होता पुन्हा नव्या जोमाने पुढील स्पर्धेची तयारी करून अधिकाधिक यश संपादन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे उपस्थित खेळाडूंना सांगितले.

या वेळी जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, शिवछत्रपती पुरस्कार विजेते, तसेच निवड समितीचे सदस्य सूर्यकांत ठाकूर, संजय कडू, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जनार्दन पाटील, प्रो-कबड्डी स्पर्धेचे पंच सुहास पाटील, कबड्डी असोसिएशनचे पंच, तांत्रिक अधिकारी, क्रीडाशिक्षक आदी उपस्थित होते. उपस्थितांचे क्रीडा अधिकारी सचिन निकम, क्रीडा मार्गदर्शक मनीषा मानकर, समीर रेवाळे यांनी स्वागत केले. रवींद्र नाईक यांनी उपस्थितांना क्रीडा कार्यालयाच्या वतीने क्रीडा विभाग व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव लोगो असलेल्या मास्कचे वाटप केले. प्रदर्शनीय सामन्यादरम्यान ललिता बाबर, तसेच इतर मान्यवरांनी खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेसाठी जिल्हा अधिकारी, कर्मचारी, तसेच रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे पंच व इतर पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## रामाची वाडी संघाने पटकावला उपसभापती चषक

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील पाथरज ग्रामपंचायतीमधील धोत्रेवाडी गावच्या रहिवासी असलेल्या तालुका पंचायत समितीच्या उपसभापती जयवंती हिंदोळा यांच्या माध्यमातून आदिवासी खेळाडूंसाठी उपसभापती चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील रामाचीवाडी येथील जय धनकोबा क्रिकेट संघाने स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.



कर्जत तालुक्यातील धोत्रेवाडी येथे उपसभापती चषकाचे आयोजन करण्यात आले होते. आदिवासी समाजातील एकूण ३२ संघ या स्पर्धेत सहभागी झालले होते. या स्पर्धेचा अंतिम सामना कशेळे नेरळ रस्त्यावरील जय धानकोबा संघ रामाचीवाडी संघ आणि जांभुळवाडी येथील जय गावदेव संघामध्ये झाला. त्यात रामाचीवाडी संघाने बाजी मारून उपसभापती चषक जिंकला. जांभुळवाडी संघ दुसऱ्या, तर अंभेरपाडा संघ तिसऱ्या आणि झुगरेवाडी संघ चौथ्या क्रमांकावर राहिला. विजेत्या संघांचा आणि खेळाडूंचा गौरव पारितोषिके देऊन करण्यात आला.

## जिल्हा बास्केटबॉल निवड चाचणी कर्जत येथे

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अ‍ॅडहॉक कमिटी (महाराष्ट्र) बास्केटबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या अधिपत्याखाली १८ वर्षांआतील आंतरजिल्हा राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल मुले व मुली यांची स्पर्धा औरंगाबाद येथे १२ ते १६ डिसेंबर रोजी होणार आहे. या स्पर्धेसाठी रायगडचा संघ सहभागी होण्यासाठी रविवारी (दि. २८) १८ वर्षांआतील (ज्युनियर) मुले व मुली बास्केटबॉल निवड चाचणीचे आयोजन कॉर्वस अमेरिकन अकादमी, वडवली, कर्जत येथे करण्यात आले आहे.

या निवड चाचणीसाठी १ जानेवारी २००३ नंतर जन्म असलेले खेळाडू पात्र राहतील. जिल्हा संघ निवड चाचणीसाठी ठीक सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहणे अनिवार्य आहे. जिल्हा निवड चाचणीमधून मुलींचा संघ औरंगाबाद येथील खेलो इंडिया युथ गेम्स राज्यस्तरीय स्पर्धेसाठी रायगडचे प्रतिनिधित्व करेल. अधिक माहितीसाठी संदीप गुरव (९९६०७०२५१०) यांच्याशी संपर्क साधावा.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com